सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

मासिक

# नवस्नेह

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ५

ऑगस्ट २०२३




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# अग्निहोत्री काळाची गरज

## अग्निहोत्र चिकित्सा– अग्निहोत्र भस्म



श्रीमती मोनिका येले ह्यांनी सांगितले अग्निहोत्र भस्माच्या शक्तीचा अनुभव आम्हाला अनायासच समजून आला. आम्ही आमच्या बागेत अग्निहोत्राची थंड राख दररोज टाकत असू. जिथे राख टाकली जात असे त्या जागची रोपे व झाडे आश्चर्यकारकरित्या विकसित होत होती. त्यांच्यावर पडलेली कीड नष्ट होत होती. पुढे अधिक अभ्यास केल्यानंतर आमच्या असे लक्षांत आले की हे भस्म मानवी शरीरातही अवयवावर येणारी सूज (Inflamation किंवा Fungus of the skin) कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

या फार्मासिस्ट श्रीमती मोनिका येले व त्यांचे पती यांनी मिळून अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यास करून व संशोधन करून अग्निहोत्र भस्मापासून अनेक औषधांची निर्मिती केली आहे. अग्निहोत्र भस्मापासून बनलेल्या गोळ्या कॅप्स्यूल्स, मलमे, आय ड्रॉप्स वगैरे अनेक प्रकारांनी व विविध रोगावर उपचार चालू झाले आहेत. त्यांनी ज्या रोग्यांवर अग्निहोत्र भस्माच्या साहाय्याने उपचार केले त्या सर्वांनी स्व हस्ताक्षरांत आपल्या आरोग्य लाभाचे अनुभव लिहून दिले आहेत. अनेक वर्षे न भरून येणाऱ्या जखमा केवळ अग्निहोत्राचे भस्म लावण्याने भरून आल्या. जुनी पोट दुखीची तक्रार थोड्याच काळात ठीक झाली. त्वचारोगांवर तर हे फारच प्रभावी औषध ठरत आहे.

अग्निहोत्र भस्माचा हा विलक्षण प्रभाव पाहून स्थानिक रसायन शाळेने आपल्या प्रयोगशाळेत अग्निहोत्र भस्मापासून तयार केलेल्या औषधांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन चालू केले आणि त्या रसायन शाळेच्या नावाचे लेबल लावून डब्यातून व बाटल्यांतून या औषधी विनामूल्य वितरीत केल्या जातात. या संबंधी श्रीमती येले यांचे असे मत आहे की :

अग्निहोत्र भस्मात जर इतकी शक्ती आहे तर कल्पना करा की अग्निहोत्रात किती अधिक शक्ती असेल. केवळ आपल्या घरांत अग्निहोत्र करणे हिच सर्वात मोठी औषधी आहे. त्याचेच अधिक महत्व आहे. परंतु अग्निहोत्राची राखही किती प्रभावी आहे हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे.

औषधे तयार करून ती विकणे हे आमचे उद्दिष्ट नाही. आपण स्वत: अग्निहोत्र करा. स्वत:च्या घरात तयार होणाऱ्या अग्निहोत्राच्या भस्मापासून स्वत:च ही औषधे घरांत तयार करा. केवळ अग्निहोत्र केल्यानेच आपल्याला इतर सर्व औषधांपासून मुक्ती मिळेल.

अग्निहोत्राने निर्माण होणाऱ्या वातावरण व भस्मावर आज सर्व जगांत संशोधन व अभ्यास होत आहे, परंतु या अभ्यासाची गतीच उलट आहे. अग्निहोत्र भस्माचा कोणत्या रोगावर काय परिणाम होते ते पहाण्याऐवजीअग्निहोत्र नियमित केल्यामुळे हा उत्तम परिणाम निश्चित कशा प्रकारे झाला हाच आमच्या अभ्यासाचा विषय होऊ पहात आहे. अर्थात अग्निहोत्र भस्माने का व कसा फायदा झाला असे संशोधन होते.

आतापर्यंतच्या सर्वच लेखांच्या आधारे एक गोष्ट स्पष्ट होते की अग्निहोत्र भस्मही अनेक शारीरिक व मानसिक समस्या दूर करण्यासाठी प्रभावी औषधी आहे.जे दूषित माती – पाणी – वातावरण तसेच वनस्पती – प्राणी व मानवाचे विविध आजार दूर करण्यास मदत करते.असे हे औषधी भस्म अग्निहोत्र विधी घरोघरी केले असता प्रत्येक घरात विनायास सहज उपलब्ध होवू शकते.आपले महान ऋषीमुनी विभूती देवून अनेक व्याधी बरे करायचे त्यात संपूर्ण विज्ञान सामावलेले होते. *त्यात कोणतीही अंधश्रद्धा नव्हती. संशोधन झालेले नसल्याने आपल्याला भस्म महत्व खरे समजले नाही. वेदोक्त विधीतून जे भस्म निर्माण होते त्यात संपूर्ण रोगनिवारणची शक्ती सामावलेली असते हे आता वैज्ञानिक मान्य करत आहेत. तर आपण नको का अग्निहोत्र भस्माचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करायला...!

अग्निहोत्र केले तर भस्म सहजच उपलब्ध होईल घरोघरी...!

नवीन वर्षात सर्वांनी मिळून नक्की करूयात का आपापल्या घरात अग्निहोत्र आचरण...

**कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र**

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक ५ : ऑगस्ट २०२३**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या – 'आण्डाल'** /५
 – ज्योत्स्ना शिंत्रे

३) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / ८
 – सौ. मंजुश्री गोखले

४) **राजमाता जिजाबाई शहाजी भोसले** / ९

५) **मुलांचे पान** / १२

६) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ – सौ. मंजुश्री गोखले

७) **संगीताच्या बागेतले ब्रह्मकमळ** /१७
 – संकलित

८) **म्हणींचे म्हणणे** /२० – वैदेही जोशी

९) **लंडनमध्ये मराठी आजीबाई** /२१ – संकलित

१०) **१२ वर्षांतून येणारा श्रावण अधिक मास** /२२
 – श्री. नंदकुमार मराठे

११) **शैक्षणिक पारितोषिक योजना निवेदन** /२४

१२) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५


- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231–2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १९ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

कसे आहात? पाऊस पडतोय म्हणून थोडे सुखावलेले की हवा तेवढा पडत नाही म्हणून चिंतेत आहात? अर्थात, त्याचं पडणं, न पडणं आपल्या हातात नाही. आणि जे आपल्या हातात नाही, त्याची चिंता कशाला? अधिक-श्रावण सुरू झाला आहे. व्रत-वैकल्यांची, वाणं देण्याची गडबड असेल ना? त्यात ही चिंता मिटवून टाका आणि व्रतवैकल्यांसोबत नवस्नेह वाचण्याचा आनंद मिळवा. गोष्ट अशी आहे, की बाहेर म्हणजे सामाजिक-राजकीय क्षेत्रात नको ती भेसळ आहे. त्यामुळं आपली व्रतवैकल्ये आणि नवस्नेह हे दोन्ही चोख, शुद्ध असल्याने त्यांचा आस्वाद घेणे हे आनंददायीच ठरणार ! नाही का?

'अधिकस्य अधिकम् फलम्' म्हणतात ते काही उगीच नाही. आपल्या सभोवती उबग आणणाऱ्या या साऱ्या गोष्टी घडत असताना निर्भेळ आनंद देणाऱ्या गोष्टींना स्वीकारणं, त्यांचा आस्वाद घेणं यासारखा दुसरा शहाणपणा नाही. खरं ना?

मित्रांनो, पाऊस तर पडतोय. पहिली दोन नक्षत्रं तर कोरडी गेली. आता यापुढं काय होतय बघू ! अर्थात, पावसाचं आगमन सुखावह होतच केव्हाही ! सगळ्यांनाच ! काही बाबतीत तर पाऊस आला की बाबच विलक्षण बदल घडवणारी ठरते. निसर्गात, जमिनीत, हवेत, पानाफुलांत, मनात, सगळीकडे !

**बारीश की चंद बुंदे क्या गिरी,**
**श्रृत की फितरत ही बदल गयी ।**
**कल जो मुँह तक उड़ती थी,**
**आज पैरों से लिपट गयी ।**

हे सर्वत्र, सर्वांनाच लागू होतं. अर्थात, पाऊस हा असतोच तसा, आनंद देणारा, दिलासा देणारा, विश्वास देणारा आणि मैत्र जोडणारा. अगदी नवस्नेह सारखा !

तेव्हा मित्रहो, अधिक-श्रावण महिन्याच्या शुभेच्छा ! गृहिणींना, गुरुजींना, पुरोहितांना, जावयांना हा अधिक-श्रावण मास भरभराटीनं पुण्य देणारा जावो, ही सदिच्छा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या - आण्डाल

**(लेखांक सातवा)**

आजचा हा लेख तामिळ स्त्री संत आण्डाल हिच्याबद्दल आहे.. ही बारा आळवार संतांपैकी एक अग्रणी संत. ती त्या संतपरंपरेतील एकमेव स्त्री संत होती. अळवार संत परंपरा ही बारा संतांची परंपरा मानली जाते. त्यापैकी तिचा क्रमांक नववा होता.

'आळवार' ही एक वेगळीच संतपरंपरा मानली जाते. या तामिळ शब्दाचा अर्थ असा आहे – परमश्वेराशी एकरूप झालेली व्यक्ती. या परंपरेतील आठवे संत पेरियालवार यांची आण्डाल ही कन्या. हिचा जन्म श्रीवेल्लीपुथूर या गावी झाला. या गावी रंगनाथाचे एक प्राचीन मंदिर आहे. त्याच मंदिरात पेरियालवार हे राहत असत. सर्वसाधारण आठव्या शतकात तिचा जन्म झाला असे मानले जाते. तिचे वास्तव्य श्री रंगनाथ मंदिर, श्रीरंगपट्टणम इथे बहुतांश काळ होते.

आण्डाल ही पेरियालवार म्हणजेच विष्णुचित्त ह्या विष्णुभक्ताची मानलेली मुलगी. हा विष्णुचित्त रोज सकाळी कृष्णाच्या-विष्णूच्या पूजेसाठी, मोठ्ठा हार करण्यासाठी तुळशीपत्र जमा करीत असे. रोजची तुळशीपत्रे मिळावीत म्हणून त्यांनी आपल्या परसदारी मोठ्ठी तुळशीची बाग केलेली होती. रोज सकाळी ते विष्णुस्तुती म्हणत म्हणत तुळशीपत्रे जमा करीत. अशाच एका शुभ सकाळी विष्णुचित्ताला बागेत एक नवजात कन्या सापडली. इतकी छोटी मुलगी, तिला कोठे थंडी वाऱ्यात सोडणार असा विचार करून पेरियालवार तिला घरी घेऊन आले. ती त्यांची कन्याच होऊन गेली. तिचे नाव त्यांनी 'कोदै'असे ठेवले. कोदै म्हणजे मोहनवेल...

कोदै जसजशी मोठी होत गेली, तसतशी विष्णुचित्तानी तिच्यावर देवपूजेची तयारी करण्याचे काम सोपवले. पूजेची तयारी करता करता ती रंगनाथाच्या म्हणजेच श्रीविष्णूच्या भक्तीत तल्लीन होऊ लागली. ती रंगनाथालाच आपला पती समजू लागली. त्यामुळे देवाच्या प्रत्येक वस्तूवर आपला हक्क आहे, त्याची प्रत्येक वस्तू आपल्याला वापरण्याचा अधिकार आहे, अशी तिची भावना होती. तिचे वयही फारसे नव्हते. त्यावेळेस तिच्या निष्कपट मनात ही भावना निर्माण झाली. त्यामुळे ती रंगनाथाला वाहिले जाणारे षोडोपचार आधी स्वतः लेवून पाही. सर्व साज केल्यावर ती आरशात पाही आणि या आरशात दिसणाऱ्या देवप्रतिमेला विचारे- मी केलेला हा शृंगार तुला आवडला ना? हा मी तुला वाहू ना? देवाची संमती मिळाल्यावर म्हणजेच तिच्या मनाचे समाधान झाल्यावरच ती रंगनाथाला वाहण्याची फुले, हार वगैरे उतरवून पूजेच्या तबकात ठेवून तयारी पूर्ण करीत असे. हे तिच्या स्वतः शिवाय कोणालाही माहित नव्हते

पण एकदा हे तिचे गुपित फुटलेच. तिने उतरून ठेवलेला हार देवाला अर्पण करताना त्या हारात एक लांबलचक केस अडकला आहे असे पेरियालवार यांच्या लक्षात आले. काय झाले असावे याचा त्यांना लगेच अंदाज आला. तेव्हा त्यांनी कोदैला बोलावून जाब विचारला. तिने अत्यंत निरागसपणे सत्य त्यांना सांगितले. एवढेच नाही तर मी रोजच असे करते. मी स्वतः हार गळ्यात घालून देवाला दाखवते आणि त्याची पसंती मिळाल्यावरच मी तो पूजेसाठी ठेवते. तो माझा पती आहे त्यामुळे त्याची पसंती कळल्याशिवाय षोडशोपचार त्याला कसे अर्पण करू? असेही त्यांना विचारले. ती वयाने लहान असल्यामुळे ते तिला जास्त काही सांगू शकले नाहीत. या सगळ्या प्रकारात काय गैर आहे ते कळण्याचे तिचे वयच नव्हते. म्हणून त्यांनी तिला फक्त एकच सांगितले की यापुढे पूजेची तयारी मीच करत जाईन, तू करू नकोस.

कोदैला फारच वाईट वाटले. ती रडत रडत घरात निघून गेली. पण सर्व काळ ती मनोमन तिच्या पतीला- रंगनाथाला विचारात राहिली, 'तू असं मला तुझ्या सेवेपासून दूर का केलंस? तू पती-पत्नीचं नातं अशा प्रकारे नष्ट का केलंस?'

त्या दिवशी कोदै संपूर्ण दिवस कोणाशी बोलली नाही, मैत्रिणींशी खेळायला गेली नाही, की जेवलीही नाही. ती फक्त श्रीरंगाची करुणा भाकत राहिली. प्रार्थना करत राहिली, आपल्या पतीला जाब विचारत राहिली. शेवटी देवाला तिच्या भक्तीपुढे, समर्पण भावापुढे नमावंच लागलं. पुढे पेरियालवार यांच्या स्वप्नात श्रीरंग प्रकट झाला. तेही तळमळतच होते. आपल्या आणि मुलीच्या हातून इतकी मोठी चूक झाली. मानवाने वापरलेले षोडोपचार देवाला वाहिले गेले. अनावधानाने का

होईना, या भावनेने पश्चातापाने ते खूप उशीरा रात्रीपर्यंत तळमळतच राहिले.

अगदी पहाटे पहाटे जेव्हा त्यांचा थोडा डोळा लागला, तेव्हा श्रीरंग त्यांच्यापुढे प्रकट झाला. 'मुलीवर रागावू नकोस. ती माझी पत्नी प्रिया आहे. आण्डाल आहे. त्यामुळे तिने उतरवलेला हारच मला प्रिय आहे. रोज तसाच हार मला घालत जा.' एवढे सांगून देव निघून गेला. पेरियलवार नुसते झोपेतूनच नव्हे, तर भक्तीभावनेच्या रूपानेही जागे झाले. त्यांना आपल्या मुलीची-कोदैची महती कळून चुकली. देवाने खुद्द तिला 'आण्डाल' म्हणजे 'प्रिया' असे संबोधले होते !

पहाट होईपर्यंत त्यांनी कसातरी धीर धरला. जसा पहाटेचा पहिला कोंबडा आरवला, पेरियलवार घाईघाईने कोदैला उठवायला गेले. ती तर जागीच होती. रात्रभर तळमळत होती. वडिलांना पाहिल्यावर ती उठून उभी राहिली. पण पेरियलवार यांनी तिचे पायच धरले. कोदैला वाटले, वडील फारच रागावले आहेत. एक त्रागा म्हणून आपले पाय धरत आहेत. परंतु पेरियालवारांनी तिला आपले स्वप्न सांगितले. देवाने दिलेला दृष्टांत तिला सांगून तिला पोटाशी धरले. अशी मुलगी मिळाल्याबद्दल आपण धन्य धन्य झालो आहोत असे त्यांचे शब्द ऐकून आणि त्यांच्या दृष्टांताबद्दल कळल्यावर कोदै पूर्णपणे बदलली. ती सदैव विष्णुभक्तीतच मग्न राहू लागली. स्वतःच्या पतीशी वागावे, त्याच्यावर हक्क गाजवावे, प्रेम करावे तसेच देवाशी - श्रीरंगाशी - कृष्णाशी वागू लागली. ती खरोखरीची आण्डाल म्हणजे कृष्ण सखी - विष्णुसखी झाली !

त्यानंतर तिला पतीगृही जायची विलक्षण ओढ लागली. विरहिणीची व्यथा तिला जाणवू लागली. पण तिचा पती, तिचा श्रीरंग तिला दर्शन देईना. तेव्हा तिने एक खडतर व्रताची सुरवात केली. त्यात तिच्या मैत्रिणीही सामील झाल्या. थंडीच्या मार्गशीर्ष महिन्यात अगदी पहाटे उठून, नदीवर जाऊन, नदीच्या थंड पाण्यात आंघोळी करून, पूर्ण दिवस उपवास करून फक्त श्रीरंगाचे नामस्मरण करणे असे ते व्रत होते. हे व्रत आजही तामिळनाडूमध्ये कुमारी कन्या करतात.

कोदैने हे व्रत करणे सुरू केल्यावर लवकरच तिच्या पित्याच्या स्वप्नात येऊन पुन्हा श्रीरंगाने त्यांना आदेश दिला की, 'उद्या कोदैला नववधूचा साज शृंगार करून श्रीरंगपट्टणम इथे घेऊन या.'

मुलीच्या मोठेपणाची महती माहीत झाल्यामुळे पेरियलवार यांनी परमेश्वराचा आदेश मानला आणि कोदैला नववधूप्रमाणे सजवून, पालखीत बसवून ते तिला श्रीरंगपट्टणम इथे घेऊन आले. कोदैच्या मनालाही परमेश्वराची चाहूल लागलेलीच होती. त्यामुळे मंदिर दिसू लागल्याक्षणीच ती पालखीतून उतरली आणि देवाच्या मूर्तीकडे धावत सुटली. देवही तिच्या स्वागतासाठी मूर्त रूप घेऊन प्रकट झाला. चार पावले पुढे येऊन तिला त्याने आपल्या हृदयाशी धरले. आणि देव पुन्हा मूर्तीमध्ये विलीन होऊ लागला. तेव्हा कोदैही ज्योतीस्वरुपात श्रीरंग मूर्तीत विलीन झाली. पुढे ती कोणालाच कधीच सदेहाने दिसली नाही. तेव्हापासून तिचे नाव 'आण्डाल' म्हणजे मोक्ष पावून विष्णुप्रिया - कृष्णप्रिया झालेली स्त्री असे झाले.

या कथेत आपल्याला एक गोष्टीची स्पष्ट जाणीव


## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**- अध्यक्ष**

होते, की जो परमेश्वराचा खरा भक्त असतो, त्याचा आश्रय देव कधीच तुटू देत नाही. देव अशा भक्ताला सदैव संरक्षण देत असतो. स्वतःच्या नजरेपासून तो भक्ताला कधीच दूर जाऊ देत नाही. परमेश्वराची प्रत्येक गोष्ट जशी भक्ताला अतीप्रिय असते तशीच भक्ताचीही प्रत्येक गोष्ट देवाला अतिप्रिय असते. कारण भक्त मुळातच देवाच्या इच्छेने वर्तावे अशा लीन वृत्तीनेच वागत असतो.

काही काळासाठी जरी भक्ताला वाट बघावी लागली, तरी त्यात त्याचेच कल्याण असते. कारण त्याच्या आयुष्यातले थोडेफार हिणकस, त्याच्या साधनेमुळे जळून जाते आणि भक्त बावनकशी सोन्यासारखा होतो. मगच त्याला परमेश्वर स्वतःत विलीन करून घेतो. भक्ताला मोक्ष मिळतो.

आण्डाल हिची काव्ये – तिरुप्पावई आणि नचियार तिरुमोळी आजही मार्गशीर्ष महिन्यामध्ये तामिळनाडूमधील वैष्णवांकडून गायली जातात. अत्यंत हळवा, उत्कट प्रेमभाव आणि श्रीरंगाबरोबरच्या सहवासाची प्रेमभरी वर्णने यांनी ही काव्ये तयार झालेली आहेत.

तिच्या या काव्यामधून ती किती कृष्णलीन झाली होती, हे आपल्या लक्षात येते. तिला तामिळनाडूमध्ये म्हणूनच रंगनायकी असे संबोधले जाते. म्हणजे रंगनाथावर अधिकार गाजवणारी. स्वाभाविकच तिलाही कृष्णसख्या या नामाभिधानात सामील करावे लागते.

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,** मोबा. ९९२००५८७०५

# जगणं...

येईल साठी, येईल सत्तरी
करायची नाही कुणीच चिंता,
प्रत्येक दिवस मजेत जगायचा
वाढवायचा नाही अपेक्षांचा गुंता.

वय झालं म्हातारपण आलं,
उगाच कोकलत बसायचं नाही.
विनाकारण बाम लावून,
चादरीत तोंड खुपसायचं नाही.

तुम्हीच सांगा छंद जोपासायला,
वयाचा संबंध असतो कां ?
रिकामटेकडं घरात बसून
माणूस आनंदी दिसतो कां ?

पोटा-पाण्यासाठी पोरं-सुना
घर सोडून जाणारच,
प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये
असे रितेपण येणारच.

करमत नाही, करमत नाही
सारखे-सारखे म्हणायचे नाही,
आवडत्या कामात दिवस घालवायचा
उगाचच कुढत बसायचं नाही.

घरातल्या घरात वा बागेत
हिंडाय-फिरायला जायचं,
वय जरी वाढलं असलं तरी
मनपसंत गाणं मनमोकळं गायचं.

गुडघे गेले, कंबर गेली
नेहमी नेहमी कण्हायचं नाही,
आता आपलं काय राहिलं ?
हे फालतू वाक्य कधीच म्हणायचं नाही.

पिढी दर पिढी चालीरीतीत
थोडे फार बदल होणारच,
पोरं-पोरी त्यांच्या संसारात
कळत नकळत गुंतणारच.

तू-तू, मै-मै, जास्त अपेक्षा
कुणाकडूनही करायची नाही,
मस्तपैकी जगायचं सोडून
रोज थोडं थोडं मरायचं नाही.

स्वत:च स्वत:ला समजवायचं असतं
पुढे पुढे चालत राहायचं असतं,
वास्तू तथास्तू म्हणत असते
हे उमजून निरामय जगायचं असतं.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ४ : कर्म ब्रह्मार्पण योग**

**श्रीभगवानुवाच ।**

**अव्यययोग पूर्वी सांगितला रवी ।**
**सूर्य मनूस दाखविला स्वभावी ।**
**मनूने इक्ष्वाकुसी । निरोपिला ।।**
योग हा अविनाशी मी स्वयें सूर्यास बोलिलों ।
मनूस बोलिला सूर्य तो इक्ष्वाकूस त्यापरी ।।१।।

**ऐसा परंपरा चालिला । जो हा राजऋषीही जाणितला ।**
**बहु काळें बुडाला । कर्मयोग रे अर्जुना ।।**
अशा परंपरेंतूनि हा राजर्षीस लाभला ।
पुढें काळ-बळानें तो ह्या लोकीं योग लोपला ।।२।।

**आणि तें हें म्या तुज बुद्धि । योग सांगितला अनादि ।**
**तूं सखा भक्तनिधी । म्हणोनि रहस्य उत्तम सांगितले ।।**
तो चि हा बोलिलों आज तुज योग पुरातन ।
जीवीचें गूज हें थोर तूं हि भक्त सखा तसा ।।३।।

**अर्जुन उवाच ।**

**अर्जुन म्हणे श्रीकृष्णनाथा ।**
**तुझा अलिकडे जन्म असता ।**
**तू सांगतोसि अनादि सूर्याची कथा ।**
**हे कांही न कळे मज ।।**
ह्या काळचा तुझा जन्म सूर्याचा तो पुरातन ।
तूं बोलिलास आरंभीं हें मी जाणूं कसें बरें ।।४।।

**श्रीभगवानुवाच ।**

**कृष्णे म्हणितले तुज मज ।**
**बहूत अवतार जाले सहज ।**
**तें अवघें ज्ञान आहे मज । तूं नेणसी अर्जुना ।।**
माझे अनेक ह्यापूर्वी झाले जन्म तसे तुझे ।
जाणतों सगळे मी ते अर्जुना तूं न जाणसीं ।।५।।

**अव्ययोमि आत्मावतारु । सर्व भूतांच्या ठायीं ईश्वरु ।**
**प्रकृतीचे ठाई निरंतरु । मायाधीन जन्म धरितसे ।।**
असूनि हि अजन्मा मी निर्विकार जगत्-प्रभु ।
माझी प्रकृति वेढूनि मायेनें जन्मतों जणूं ।।६।।

**जे जे काळी धर्मासी । स्थान भ्रष्ट होय परियेसी ।**
**ते काळी अवतरुनी तयासी । स्थापिता होय ।।**
गळूनि जातसे धर्म ज्या ज्या वेळेस अर्जुना ।
अधर्म उठतो भारी तेव्हां मी जन्म घेतसें ।।७।।

**पवित्र साधु तरावे । आणि दुष्टासी नाश करावे ।**
**धर्मासी स्थापन व्हावे । म्हणुनी युगायुगी मी अवतरे ।।**
राखावया जगीं संतां दुष्टां दूर करावया ।
स्थापावया पुन्हां धर्म जन्मतों मी युगीं युगीं ।।८।।

**माते जन्मकर्म दिव्य असे जाण ।**
**तयाचि खूण ज्ञानी धरिती आपण ।**
**तया नाही जन्म मरण । तो मज पावे निश्चित ।**
जन्म-कर्मे अशीं दिव्य जो माझीं नीट ओळखे ।
देह गेल्या पुन्हां जन्म न पावे भेटुनी मज ।।९।।

# राजमाता जिजाबाई शहाजी भोसले



राजमाता जिजाबाई शहाजी भोसले (१२ जानेवारी इ.स. १५९८ – १७ जून , इ.स. १६७४) ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या. त्यांना राजमाता, राष्ट्रमाता, जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जाते. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाबाईंचे वडील व आईचे नाव म्हाळसाबाई होते. जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते. डिसेंबर इ.स. १६०५ मध्ये जिजाबाईंचा शहाजीराजांशी दौलताबाद येथे विवाह झाला.

जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या.

भारत सरकारने ७ जुलै १९९९ रोजी जिजाबाईंच्या सन्मानार्थ डाक तिकीट प्रकाशित केले. जिजाबाई या अनेक चित्रपट आणि पुस्तकांच्या प्रेरणा आहेत.

**इतिहास**

जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड जवळील देऊळगाव येथील म्हाळसाबाई आणि लखुजी जाधव यांच्या पोटी झाला. लखोजीराजे जाधव हे मराठा कुलीन होते. जिजाबाईंचा विवाह लहान वयातच वेरूळ गावातील मालोजी भोसले यांचा मुलगा शहाजी भोसले यांच्याशी झाला. त्यांनी शिवरायांना स्वराज्याची शिकवण दिली आणि एक महान योद्धा म्हणून उभे केले.

१७ जून १६७४ रोजी जिजाबाईंचा मृत्यू झाला. सी.व्ही. वैद्य यांनी त्यांच्या मध्ययुगीन भारत या पुस्तकात असे म्हटले आहे की, यादव निश्चितपणे शुद्ध मराठा क्षत्रिय आहेत. जिजाबाई (शिवाजी महाराजांच्या, ज्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली, त्यांच्या आई) या मराठा/ देवगिरि जाधव/यादव साम्राज्याचे महाराज लखोजीराजे जाधवांच्या पुत्री होत्या.

**भोसले व जाधवांचे वैर**

लखुजीराव जाधव हे निजामशाही दरबारातील बलाढ्य, मातब्बर मंडळीपैकी एक होते. एक दिवशी सर्व सरदार, जहागिरदार, मनसबदार आणि वतनदार शाही कदम पोशी करून आपापल्या घरी जावयास निघाले असता महाद्वार सामोरी भयंकर गर्दी झाली. या गर्दीत खंडागळ नावाच्या सरदाराचा हत्ती अनियंत्रित झाला. आणि लोकांना पायाखाली तुडवू लागला.

अशावेळी लखुजीराव जाधव यांचा मुलगा दत्ताजीने आपल्या सैन्यासह हत्तीला रोखण्यासाठी त्यावर बाणांचा, भाल्यांचा आणि तलवारीचा वार करू लागले. हे सर्व प्रकरण रोखण्यासाठी विठोजी राजे भोसले यांचे दोन्ही मुलगे संभाजी आणि खेलोजी (शहाजीराजे यांचे चुलतभाऊ) दत्ताजीवर तुटून पडले. आणि भोसले – जाधव यांच्यात युद्ध पेटले. आणि संभाजी ने दत्ताजीला ठार केले. ही बातमी पुढे पोहचलेल्या लखुजीराव जाधव यांना कळताच ते सूड घेण्यासाठी भोसल्यांवर चालून आले आणि संभाजीवर प्रहार केला. आपल्या चुलतभावावर वार केला म्हणून शहाजीराजे भोसले देखील या लढाईत उतरले परंतु लखुजीराव जाधवांचा आक्रोश सामोरी त्यांचा टिकाव लागला नाही. लखुजीराव यांच्या

तलवारीच्या प्रहाराने शहाजी महाराज गंभीर जखमी झाले. आणि त्यांनी अखेरीस संभाजीला ठार केला.

या प्रसंगानंतर जिजाबाईंनी आपल्या पतीशी एकनिष्ठ राहत आपल्या माहेराशी संबंध तोडले. नात्यांना, भावनांना बाजूला सारून आपल्या कर्तव्यात कसल्याही प्रकारचा कसूर न होऊ देता धैर्याने आणि खंबीरपणे आल्या प्रसंगाला सामोरे जाण्याचा जिजाबाईंचा हा गुण शिवाजी राजांत पुरेपूर उतरला होता.

**अपत्ये**

जिजाबाईंना एकूण सहा (६) अपत्ये होती. त्यापैकी ४ दगावली (मतभेद आहेत) व दोन मुलगे होते. त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा शहाजी राजांजवळ वाढला तर शिवाजी राजांची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईंवर होती.

जिजाबाईंना पहिले अपत्य झाले त्याचे नाव तो सहा महिन्याचा झाल्यानंतर आपल्या मृत दीराच्या नावाप्रमाणे संभाजी ठेवले. त्यानंतर त्यांना ४ मुले झाली; चारही दगावली. ७ वर्षाचा काळ निघून गेला. १९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ या दिवशी सूर्यास्ताच्या वेळी शिवनेरी येथे जिजाबाई यांना मुलगा झाला. मुलाचे नाव शिवाजी ठेवले.

**मुलाचे संगोपन व राजकारभार**

शिवाजी महाराज १४ वर्षांचे असताना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीर सुपूर्त केली. अर्थातच जहागीरीची वहिवाट लावण्याची जबाबदारी जिजाबाईंवर येऊन पडली. कुशल अधिकाऱ्यांसमवेत जिजाबाई आणि शिवाजी पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मुघलांच्या सततच्या स्वाऱ्यांमुळे पुण्याची अवस्था अतिशय भीषण होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिवाजी यांच्यासोबत नेटाने पुणे शहराचा पुनर्विकास केला. सोन्याचा नांगर घडवून त्यांनी शेतजमीन नांगरली, स्थानिक लोकांना अभय दिले. शिवाजी राजांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलली. जिजाबाईंनी शिवरायांना पारतंत्र्यात सुरू झालेल्या आणि स्वातंत्र्यात संपलेल्या रामायण, महाभारतातील गोष्टी सांगितल्या. सीतेचे हरण करणाऱ्या रावणाचा वध करणारा राम किती पराक्रमी होता, बकासुराचा वध करून दुबळ्या लोकांची सुटका करणारा भीम किती पराक्रमी होता, वगैरे. जिजाबाईंनी दिलेल्या या संस्कारांमुळेच शिवाजीराजे घडले. जिजाबाईंनी नुसत्या गोष्टीच सांगितल्या नाहीत तर सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे पहिले धडेही दिले.

शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वतः बारकाईने लक्ष ठेवले. शहाजीराजांची कैद व सुटका, अफजलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, खुद्द जिजाबाई राज्यकारभारावर बारीक लक्ष ठेवत असत. आपल्या जहागिरीत त्या जातीने लक्ष घालत. सदरेवर बसून स्वतः तंटे सोडवत.

**मृत्यू**

१७ जून १६७४ रोजी किल्ले रायगडाजवळील पाचाड गावात त्यांचे निधन झाले. तेव्हा शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अवघे बारा दिवस झाले होते.

**जीवन व कार्य**

जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. हे सर्व गुण त्यांनी शिवरायांना दिले. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या.

त्यांचा मोठा मुलगा संभाजीचा मृत्यू अफझलखानाने केला होता. त्याचा सूड घेण्यासाठी त्यांनी शिवरायांना प्रोत्साहन दिले, जे त्यांनी पूर्ण केले.

पुणे येथील आपल्या पतीची जहागीर त्यांनी समर्थपणे चालवून त्याचा विकास केला. त्यांनी कसबापेठ गणपती मंदिराची स्थापना केली. तसेच

केवरेश्वर मंदिर आणि तांबड्या जोगेश्वरी मंदिराचा जीर्णोद्धार केला.

शहाजी राजे बंगळूरात वास्तव्यास असतांना शिवाजीराजांच्या आई व वडिलांची चोख जबाबदारी जिजाबाईंनी मोठया कौशल्याने पार पाडली. सईबाईंच्या पश्चात संभाजी राजांचीही संपूर्ण जबाबदारी त्यांनी उचलली.

शिवरायांच्या पहिल्या पत्नी सईबाईंचे भाऊ बजाजी निंबाळकर यांचे जुलमाने धर्मपरिवर्तन झाले होते. त्यांची हिंदू धर्मात परत येण्याची इच्छा होती, राजांचाही त्याला पाठिंबा होता. या धर्मराजकारणात जिजाबाई राजांच्या पाठीशी ठाम उभ्या राहिल्या. राजांची कन्या सखुबाईंना, बजाजी निंबाळकरांच्या मुलाला देऊन त्यांनी राज-सोयरीक साधली आणि बजाजींना पूर्णपणे धर्मात परत घेतले. या संपूर्ण प्रकरणात त्यांचा द्रष्टेपणा व सहिष्णूता दिसून येते.

राजांच्या सर्व स्वाऱ्यांचा, लढायांचा तपशील त्या ठेवत. त्यांच्या खलबतांत, सल्ला मसलतीत भाग घेत. राजांच्या गैरहजेरीत स्वतः राज्याची धुरा वहात. शिवाजी राजे आग्र्याच्या कैदेत असताना स्वराज्याच्या सीमा वाढवत रांगणा किल्ला जिंकून घेतला. जिजाबाईंनी पूर्णतः जबाबदारी उतारवयातही कौशल्याने निभावून नेली.

**- संकलित**

## हार्दिक अभिनंदन !



कोल्हापूर चित्पावन संघाचे सभासद
श्री. श्रीकांत श्रीधर जोशी व सौ. वरदा श्रीकांत जोशी यांची कन्या चि. मृदूला श्रीकांत जोशी सीए परिक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

# पत्र धाडलंय तुला

पत्र धाडलंय तुला लेकरा वाचून बघ जरा
वाटंकडं डोळं लावून बसलाय बाप म्हातारा !!!

आता जमत न्हाई त्याला औत ओढणं
ताकतीभायेर झालंय बैलास्नी आवरणं
होत न्हाई त्याला शेतीच्या कामाचा पसारा !!!

शेतात जायचास त्याच्या खांद्यावर बसून
म्हणत हुतास मोठेपणी मी शेत दीन नांगरून
उचलत न्हाई त्याला
आता गवताचा बी भारा !!!

दहा तरी वर्ष झाली तू दूर देशी गेलास
सणवार सोड आजीच्या प्रेताला बी न्हाई आलास
हाडं झिजलीत मरण येऊन थांबलंय दारा !!!

परतून ये लेकरा सोड ती लोकाची चाकरी
हितं बी मिळंल तुला सुखाची भाजी भाकरी
येकदाच मिळत्यात आई बाप
म्हनून तरी ये घरा !!!

या अधू डोळ्याफुडं एकच हाय कहाणी
शेवटचं तुझ्या हातचं प्यायचं हाय पाणी
आता येवढंच हाय मागणं
डोळे लागलेत पैलतीरा !!!

पत्र धाडलंय तुला लेकरा वाचून बघ जरा
वाटंकडं डोळं लावून बसलाय बाप म्हातारा !!!

**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक सव्विसावा)

निवृत्ती-ज्ञानेश्वरानं पाहिलं. सोपानाच्या पाठोपाठ तरल अवस्थेत चार पावलं चालत होती. चार पावलं अगदी जोडीनं, बरोबर चालत होती. त्या पावलांपासून पुढे दहा पावलांवरून सोपान चालत होता. चालता-चालता तो मध्येच थांबे, कानोसा घेई, पायरव ऐकायला आला की, समाधानी चेहऱ्यानं पुन्हा पुढे चालू लागे. सोपान वेदिकेपर्यंत आला. त्यानं पाहिलं, वेदिकेजवळ चार पाट मांडले होते. दोन पाटांवर दर्भ ठेवला होता. दोन पाट रिकामे होते. चार पत्रावळींवर सगळा श्राद्धपाक वाढला होता. सोपाना त्या दोन रिकाम्या पाटांजवळ हात जोडून उभा राहिला. निवृत्ती-ज्ञानेश्वरही उमजले. तेही त्याच्या शेजारी जाऊन हात जोडून उभे राहिले. मुक्तीनंही त्यांचंच अनुकरण केलं.

तरल हवेसारखी एक हलकी चाहूल चौघांच्या समोरून गेली. त्या दोन्ही पाटांवर क्षणभर वाळूच्या पायांचे ठसे उमटले; क्षणभरच. दुसऱ्या क्षणाला वाऱ्याची झुळूक आली आणि ते ठसे पुसले गेले. पत्रावळीवर वाढलेल्या गरम श्राद्धपाकाची वाफ क्षणभर वाऱ्याच्या झुळकीनं पाटाकडे धावली. मग खाली बसली. सोपानाला हुंदका फुटला. निवृत्ती-ज्ञानेशालाही गहिवरून आलं. त्या दोघांनी दोन्हीकडूनच सोपानाला कवळा घातला. मग मात्र सोपानाचा बांध फुटला. कितीही आवरायचं म्हटलं, तरी त्याला हुंदका आवरेना. तो हमसून रडायला लागला. आपल्या डोळ्यांतून वाहणारं पाणी जराही न पुसता निवृत्ती-ज्ञानेश्वर त्याची समजूत घालू लागले. आपल्या तिघाही भावांना असं रडताना पाहून मुक्ती भांबावली. तिनं निवृत्तीच्या कमरेला मिठी मारली. तिच्या मिठीनं निवृत्ती भानावर आला. त्यानं मुक्तीचा हात धरला आणि आवाजात किंचित जरब आणून म्हणाला, ''सोपाना, काय हे? तुझ्यासारखा समंजस भाऊ रडतोय बघून ही मुक्तापण रडायला लागलीय बघ ! ज्ञानेशा, आवर त्याला. आपण आज आपल्या आई-बाबांना शब्द दिलाय ना? आणि आई-बाबांपर्यंत तो पोहोचलायही. होय ना सोपाना? मग आता हे अश्रू कशासाठी? पुसा ते डोळे ! आणि आई-बाबांना पुन्हा एकवार नमस्कार करा. त्यांच्या मोक्षप्राप्तीची वेळ झालीय.'' निवृत्तीच्या या बोलण्यानं काम झालं ! सोपानानं हुंदका आवरला. सगळेच सावरले. सगळ्यांच्या डोळ्यांत पाणी होतं आणि चेहऱ्यावर समाधान !

श्राद्धाचा, दशक्रिया विधी तर पार पडला. कावेरीअक्कांनाही बरं वाटलं. सगळ्या गावाचा विरोध पत्करून, सगळ्या अडीअडचणींना तोंड देऊनही चौघं ज्या आत्मिक शक्तीनं आणि अतुलनीय धैर्यानं सगळं करत होती, ते बघून तर कावेरीअक्कांना या मुलांचं अतोनात कौतुक वाटलं. 'हसण्या-बागडण्याचं, लगोरी खेळण्याचं यांचं वय; पण या वयात यांच्यावर केवढी जबाबदारी येऊन पडलीय. निवृत्ती-ज्ञानेशावर सगळ्या घराच्या पालन-पोषणाची, सोपानावर चिमुरड्या मुक्ताला सांभाळण्याची आणि मुक्तावर साऱ्या घराला सांभाळण्याची ! कसं करतील ही पोरं हे सगळं?' कावेरीअक्कांच्या मनात विचार आला आणि त्या विचारानं त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं. पदरानं डोळ्यांतलं पाणी पुसून त्यांनी एकवार इंद्रायणीला नमस्कार केला आणि तिथली आवरासावर करायला सुरवात केली. मुक्ता लगेच त्यांच्या मदतीला धावली. कावेरीअक्कांनी समाधानाचा नि:श्वास टाकला. मुक्ताकडे एक कौतुकाचा, मायेचा कटाक्ष टाकला आणि दर्भ गोळा करायला सुरुवात केली.

सगळे घरी आले. निवृत्ती-ज्ञानेश्वर

कावेरीअक्कांच्या घरून आणलेलं सामानसुमान पोहोचतं करण्याच्या मागं लागले, तर सोपान, मुक्ताला घेऊन झोपडीत परतला. मुक्ताच्या चेहऱ्यावरचे उत्सुक भाव, डोळ्यांतल्या शंका, हे सगळं सोपानाला लक्षात आलं, दिसलं आणि त्याच्या लक्षात आलं, की मुक्ताला खूप काही विचारायचं आहे आणि तिनं एकदा सुरुवात केली, की ती थांबणार नाही. तिनं काही विचारायच्या आतच सोपान म्हणाला, ''मुक्ते, मला कळलंय तुला बरेच प्रश्न पडले आहेत; पण झोपडीचा केर काढू या आणि मग बोलत बसू या. चालेल?'' मुक्ता काही बोलली नाही. तिने मुकाटपणे कोपऱ्यातली केरसुणी उचलली आणि लख्ख केर काढून घेतला.

कावेरीअक्कांच्या सहवासात आल्यापासून मुक्ता खूपच शहाणी आणि समंजस झाली होती. केर काढून ती सोपानासमोर येऊन उभी राहिली. आता मात्र तिच्या चेहऱ्यावर उत्सुकतेबरोबर रुसवाही दिसत होता. तिच्या चेहऱ्याकडे बघत सोपानानं आपलं हसू लपवलं. तिचा हात धरून तिला आपल्या शेजारी बसवलं आणि म्हणाला, ''मुक्ते, विचार तुला काय विचारायचं आहे ते.'' मुक्तीने एक नजर सोपानाकडे टाकली. एकदा त्याचा अंदाज घेतला. तो चांगल्या मन:स्थितीत आहे, हे समजून घेतलं. मग हळूच म्हणाली, ''सोपानदादा, मला फक्त दोनच गोष्टींचा खुलासा हवाय. सांगशील?'' सोपानाला आताही तिच्या समंजसपणाचं कौतुक वाटलं, ''तुला कोणत्या दोन गोष्टींचा खुलासा हवाय छकुले?'' सोपानाच्या या दिलाशानं मुक्ती पुढं सरसावली. ''दादा, मला आधी एक सांग. तो, तो भाताचा गोळा... काय बरं? हा पिंड ! तो पिंड उचलण्यासाठी कावळाच का लागतो? इतरही अनेक पक्षी आहेत; पण त्या ठिकाणी फक्त कावळेच होते. असे का? त्या पिंडाला काकस्पर्शच होणं गरजेचं असतं का?'' मुक्तीच्या स्वरामध्ये अनावर उत्सुकता होती. सोपानाला तिच्याकडून हा प्रश्न अपेक्षितच होता. कारण त्यानंही ज्ञानादादाला हाच प्रश्न केला होता. ज्ञानादादानं त्याच्या स्वभावाप्रमाणे या प्रश्नाचं उत्तर विश्लेषण करून दिलं होतं. त्यामुळे सोपान तयार होताच. कशी सुरुवात करावी, या विचारानं सोपान क्षणभर गप्प बसला; पण मुक्तीला तेवढाही विलंब सहन झाला नाही. ''सांग ना रं ! असा गप्प काय बसलास? तुला पण माहीत नाहीय का? तसं असेल, तर तसं सांग. मी संध्याकाळी ज्ञानादादाला विचारते !'' मुक्तीनं त्याला फटकारलंच. ''सांगतो गं चिमुरडे. माहीत आहे मला त्याचं उत्तर ! ऐक. हे बघ, कावळा हा पक्षी इतर पक्ष्यांपेक्षा वेगळा आहे !'' सोपानानं असं सांगताच मुक्ता पुन्हा फणकारली, ''हुं ! माहिती आहे. तो काळा कुळकुळीत आहे !''

''तसं नाही गं ! तो काळा तर आहेच; पण त्याला देवानं एक वेगळी नजर दिली आहे. तो एका डोळ्यानं सगळ्या दिशांकडे पाहू शकतो. तसंच या वेगळ्या नजरेमुळे त्याला दुसरीही एक अतींद्रीय शक्ती लाभली आहे. ती म्हणजे या विश्वात वावरणारे जीवात्मे, प्रेतात्मे, म्हणजे माणूस मेल्यानंतर तो ज्या स्थितीत वावरतो, ते कावळ्याला दिसतं. मग मरणाऱ्या माणसाची काही इच्छा राहिली, तर तो अतृप्त आत्मा त्या पिंडाभोवती वावरत राहतो. त्याच्या मुला-बाळांकडून त्यांच्या इच्छापूर्तीचं वचन मिळालं की, तो आत्मा त्या पिंडाजवळून बाजूला होतो. तेही कावळ्याला दिसतं. मग कावळा त्या पिंडाला स्पर्श करतो. म्हणजे कावळ्यानं पिंडाला स्पर्श केला, म्हणजे तो जीवात्मा वासनामय देहापासून मुक्त झाला. त्याची कोणतीही इच्छा अगर वासना राहिली नाही. तो मोक्षाच्या मार्गाला गेला, असं समजतात. म्हणूनच काकस्पर्श हा महत्त्वाचा विधी ठरतो. आपल्या पितरांना मोक्ष मिळावा, अशीच सर्वांची इच्छा असते. काकस्पर्शामुळे ते स्पष्ट होतं. म्हणून या विधीसाठी कावळा हाच पक्षी योग्य ठरतो.'' सोपानानं त्याला ज्ञानेशानं जसं सांगितलं होतं तसंच विश्लेषण करून मुक्ताला सांगितलं. ते ऐकून तिला तिच्या प्रश्नाचं उत्तर नीट मिळालं. मनातल्या शंकेचं पूर्ण निरसन झालं. ते समाधान तिच्या चेहऱ्यावर उमटलं. ते सोपानालाही दिसलं

आणि त्याला बरं वाटलं. मुक्तीच्या मनातल्या शंकेचं आपण पूर्ण निरसन करू शकलो, याचंच त्याला समाधान वाटलं; पण तिथंच थांबले तर ती मुक्ती कसली, तिनं पुढचा प्रश्न विचारास, ''सोपानदादा, तू गंगेवरून तो दगड आणायला गेलास, तेव्हा तिथं काय झालं? तुझा जातानाचा चेहरा वेगळंच सांगत होता आणि येतानाचा चेहरा वेगळंच बोलत होता. तिथं काय झालं सांग ना?''

मुक्तीच्या या प्रश्नानं सोपान चकित झाला. ही एवढीशी चिमुरडी; पण तिचं बरंच लक्ष आहे ! आणि बरंच निरीक्षणही ! तिच्या निरीक्षणशक्तीचं सोपानाला कौतुक वाटलं. ''अरे वा ! चिमुरडे, तुझं बरंच लक्ष होतं की गं ! पण तू म्हणतेस ते खरं आहे. जातानाचा सोपान वेगळा होता आणि गंगेच्या घाटावरून, वाळवंटातून परतणारा सोपान वेगळा होता. मुक्ते, मी तो अश्म आणायला पाण्याजवळ गेलो, तेव्हा माझ्या मनात आई-बाबांचे आणि त्यांना अन्नोदक कसं मिळणार, याचेच विचार होते. निवृत्तीदादा म्हणाला की, आपण आई-बाबांच्या आत्म्यांना आवाहन करू. तोच एक विचार माझ्या मनात रुंजी घालत होता. मी गंगेजवळ गेलो. पाऊलभर पाण्यात उभा राहिलो आणि माझ्या मनात एक विचार आला. आपल्या आई-बाबांना हाक मारून आपण आत्ताच त्यांच्याकडून शब्द घेतला तर? माझ्या मनाला तो विचार पटला आणि मी तो लगेच अमलात आणला. मी आई-बाबांना हाका मारायला सुरुवात केली. सुरुवातीला काहीच झालं नाही; मुक्ते पण नंतर नंतर मला रडू यायला लागलं. माझ्या आवाजातून ते उमटायला लागलं आणि काय सांगू मुक्ता तुला, 'सोपाना, बाळा रडू नको, आम्ही अन्नोदक घ्यायला नक्की येऊ' असा आई-बाबांचा आवाज मला ऐकायला आला आणि मी समाधान पावलो. आई-बाबांनी माझा हट्ट मानला होता. त्यांनी मला शब्द दिला आणि तो पाळलापण. आई-बाबांनी शब्द दिला म्हणून मी खूपच समाधान पावलो मुक्ता. म्हणूनच गंगेच्या घाटावर जातानाच सोपान आणि घाटावरून परतणारा सोपान वेगवेगळा होता.''


सोपान बोलत होता, सांगत होता आणि मुक्ता डोळे विस्फारून ऐकत होती. सोपानाची आई-बाबांबद्दलची भक्ती तिला माहीत होती. म्हणूनच आई-बाबांनी सोपानाच्या हाकेला प्रतिसाद दिला होता, 'ओऽ' दिली होती. मुक्तीला भरून आलं, पाणी भरल्या डोळ्यांनी ती एकटक सोपानाकडे बघत राहिली. त्या नजरेतून आसवांबरोबरच ओसंडून वाहत होता भावाबद्दलचा अभिमान, प्रेम आणि कौतुकसुद्धा. (क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**दिनविशेष (ऑगस्ट २०२३)**
**अ. श्रावण - नि. श्रावण १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**मंगळवार दि. १ :** लोकमान्य टिळक जन्मदिन, **शुक्रवार दि. ४ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.३६), **बुधवार दि. ९ :** ऑगस्ट क्रांतिदिन, जागतिक आदिवासी दिन, **रविवार दि. १३ :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यदिन, **मंगळवार दि. १५ :** स्वातंत्र्यदिन, **बुधवार दि. १६ :** फरवर्दिन, **गुरुवार दि. १७ :** श्रावण मासारंभ, **शनिवार दि. १९ :** जागतिक छायाचित्र दिन, **सोमवार दि. २१ :** नागपंचमी, **बुधवार दि. २३ :** भगवान पार्श्वनाथ निर्वाण दिन, **बुधवार दि. ३० :** नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन.

# संगीताच्या बागेतले ब्रह्मकमळ



हे आशिकअली अशा काही अनमोल बंदिशी बाळगून होते की एकदा तर रोशन आरानं लाहोरचा कार्यक्रम रद्द करून, टांग्यातलं सामान उतरवून, तिकीट कॅन्सल करून आशिकअलींची बंदिश पदरात पाडून घेतली होती ! वसंतरावानी आशिकअलीकडूनही खूपच घेतलं असणार. ३८ ते ४० या दोन वर्षात वसंतराव असे लाहोरपासून वाराणसीपर्यंत जशी काही चौथाई सरदेशमुखी वसूल करीत होते. ३८ ते ४२ मेरखंड पद्धतीनं रियाज करून गळा तयार करीत होते ४२ ते ५२ या काळात सुरेशबाबू, कुमार गंधर्व आणि भेंडी बाजारवाले अमान अली यांच्याकडून नजर मिळवीत होते. अशी जर सर्व सिद्धता होऊन चुकली होती तर ५३ पासूनच मिलिटरी अकाऊन्टस मधील नोकरी सोडून 'आता तंबोरा आणि मी' या प्रतिज्ञेनं खुल्या मैदानात ते का बरं उतरले नाहीत ? त्यासाठी आणखी एक तप म्हणजे १९६५ पर्यंत त्यांनी वाट का पाह्यली? चरितार्थासाठी गाण्यावर अवलंबून राहायचं नाही हा एक विचार त्यामागं असावा. नजर आली तरी आपल्याला अजून खूप प्रयोग करून बघायचे आहेत हीही भावना असावी. मिलिटरी अकाऊन्टस् मधील नोकरी कमी पगाराची होती पण निश्चित उत्पन्न देणारी होती. प्रापंचिक अशी तेवढी जबाबदारी पार पाडली की हवे ते प्रयोग करायला ते मोकळे होते. असं जरी होतं तरी गाण्याच्या क्षेत्रातील वसंतरावांच्या मित्रांना आणि मैत्रिणींना वसंतराव आकडेमोडीच्या नोकरीतून केवळ सुरांच्या दुनियेत जास्तीत जास्त लौकर यावेत असं वाटत होतंच. लखनौत अखतरी मंझील तर या क्षणासाठी वर्षानुवर्ष उत्कंठीत होता. कुठं लखनौ, कुठं पुणं, पण ती गझलांची मलकाजान वसंतरावांनी नोकरी सोडावी म्हणून सतत पत्र पाठवून वसंतरावांना सतावीत होती.

बेगम अखतर व वसंतराव यांच्यात बराच पत्रव्यवहार झाल्याचं कानावर होतं. या बाबतीत मी सरळ त्यांनाच विचारलं, तेव्हा ते म्हणाले – 'मी तो सर्व पत्रव्यवहार समोर शेगडी ठेवून जाळून टाकला.'

'का? असं का केलंत?'

'तीस ऑक्टोबर १९७४ ला बेगमसाहेबांचं अहमदाबाद इथं निधन झालं अशी बातमी वाचली. त्या बातमीची स्वाभाविक प्रक्रिया हीच घडली.'

'अरेरे, तो पत्रव्यवहार तुम्ही जपून ठेवायला हवा होतात वसंतराव–'

'कशासाठी? त्यांचा नि माझा तो व्यक्तिगत पातळीवरचा पत्रव्यवहार, तो कशासाठी जपून ठेवायचा? त्यांचे सूर उरी जपतोच आहे. जपून ठेवण्याजोगी तेवढीच एक गोष्ट आहे.'

'पण कुणातरी 'विश्रब्धशारदा' सारख्या ग्रंथकर्त्याला तो उपयोगी पडला असता.'

'नेमकं तेच मला नको होतं व्हायला. आम्हा दोघातल्या पत्रव्यवहाराचं जागतिक प्रदर्शन कशासाठी?'

'बेगमसाहेबा तुम्हाला गुरुजी म्हणून संबोधीत असत ना?'

'भाईनं (पी. एल.) तसं एकदा लिहून ठेवलय् खरं. माझ्याही हृदयात बेगमसाहेबांना तेच स्थान होतं. उदार कलावंतांची मनं एकमेकांना असं कळत- नकळत विद्येचं आणि कलेचं आदान प्रदान करीतच असतात. त्यातून एकमेकाबद्दलचा आदर वाढीस लागतो. कसली संबोधनं घेऊन बसलात तात्या, सहज काही तरी बोलून जातात ही थोर माणसं.'

'आपली व बेगम अखतर यांची पहिली ओळख केव्हा झाली?'

'१९३५ साली. त्यावेळीही मी त्यांची ओळख करून घेतली असे म्हणण्यापेक्षा त्यांनी माझी ओळख करून घेतली असं म्हणणंच अधिक योग्य होईल. मी तर काय त्या वेळी फक्त १५ वर्षांचा होतो. नागपूरला ताजुद्दिन अवलियाच्या ऊरुसाच्या निमित्तानं उभ्या देशातून नामवंत कलाकार यायचे, हजेरी देऊन दुवा मागण्यासाठी, तशाच त्या आल्या होत्या. माझ्याहून तीन साडेतीन वर्षांनी मोठ्या. मी उरुसातल्या प्रत्येक कार्यक्रमाला जायचा. पुढच्या रांगेत घुसून बसायचा. बाईनी गात असता एक मुष्कील जागा घेतली आणि मी एकट्यानंच एवढ्या जोरात दाद दिली की त्यांचं लक्ष गेलं. एवढया पोरसवदा वयात एवढी जाण असणारा हा लडका कोण म्हणून त्यांनी चौकशी केली. त्यामुळं ओळख होऊन ती उत्तरोत्तर वाढतच गेली. मुंबईला आल्या तर माझा मुक्काम मुंबईस असे. त्यांच्या ध्वनी मुद्रिकांचे सप्ताह घातले होते मी, मधू गोळवलकर आणि पी एल.नी.! बाई पुण्यात राम महाराज पंडितांकडे उतरायच्या. त्या बंगल्यानं सबंध रात्रंरात्र सूर कोरून ठेवले आहेत बाईंचे आपल्या अंगावर ! मी कारकुनी सोडून खुले आम गाण्यात यावं असा त्यांचा प्रत्येक पत्रात आग्रह असे. मला ते ६५ सालापर्यंत शक्य झालं नाही. ६४ साली माझी बदली नेफात करण्यात आली. तेव्हा मात्र आपल्याला काळ्या पाण्याची शिक्षा दिली आहे असं वाटलं मला. पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी स्थिती झाली माझी. मग मीच ठरवलं आता काहीही करून या सेवावृत्तीतून सुटका करून घ्यायची.'

वसंतरावांनी जवळपास दोन वर्ष हे काळंपाणी भोगलं. त्यांना ही शिक्षा भोगावी लागत आहे याची केवढी बोच होती अखतरबाईंच्या मनाला. एका खेपेस वसंतराव युनिट समवेत लखनौवरून आसामला जात असता बाईना कुणाकडून तरी आधी कळलं. लखनौ स्टेशनवर वसंतराव पाय मोकळे करण्यासाठी प्लॅट-फॉर्मवर उतरतात तो समोर बेगमसाहेबा ! हातात नुक्तच काढलेलं फर्स्ट क्लासचं तिकीट होतं त्यांच्या. वसंतरावांच्या नावानं आरक्षण करून ठेवलं होतं, दोन दिवसानंतरच्या आसाम मेलचं. ते तिकीट नाचवीत म्हणाल्या,

'अजी देशपांडेसाब, आइये, अखतरी मंझिल आपकी राह देखता है, दो दिन मेहमान बनकरही आगे जाइये. मैंने आपके लिये टिकेट भी रिझर्व करके रखा है.'

'अफसोस ! ये कैसा हो सकता है बेगमसाहबा ? मैं तो युनिट के साथ जा रहा हूं. न जाऊंगा तो कमाण्डण्ट अफसर मुझे अरेस्ट करके डंडा बेडी लगाकर ले जाएगा. मिलिटरी का कारोबार है ये. मामूली नही. आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी...' आणि वसंतराव युनिटबरोबर त्याच गाडीनं गेले.'

खरं म्हणजे मिलिटरी ही काय चीज आहे याची बेगमसाहेबांना कल्पना असायला हरकत नव्हती. मेजर जनरल हबीबुल्ला, हे अख्तरीबाईंचे दीर, बॅरिस्टर इस्तियाक अहमद अब्बासी यांचे मावसभाऊ, लष्करात बडया हुद्यावर होते. पण त्यांना कल्पना आली नाही. वसंतराव आपल्याकडचा पाहुणचार न घेताच गेले याची रुखरुख लागून राहिली बाईंना. आणि मग पुढं अप्रतिम नाट्यच घडट् !

लखनौहून येऊन पंधरा दिवस झाले असतील नसतील तोच नेफातील ऑफिसात वसंतरावांच्या नावानं एक तार आली. कमांडटनं फोडून वाचली. बहुधा त्याला काहीतरी शंका आली असावी. तारेचा कागद घेऊन तो वसंतरावांच्या टेबलाशी गेला. मजकूर वाचून वसंतराव काय समजायचं ते समजले. अभिनयपटूच ते. चेहऱ्यावर त्यांनी कमालीचं गांभीर्य आणलं. डोळ्यात अश्रुदेखील !

काय होता मजकूर तारेत ? 'मदर सीरिअस, स्टार्ट इमीजिएटली.' फक्त चारच शब्द आणि खाली सहीच्या जागी फक्त एकच अक्षर ! 'बी.'

कमाण्डन्टनं विचारलं, 'हूज सिग्नेचर इज दॅट ?'

'सर इटस् माय डॉटर. माय एल्डेस्ट डॉटर. वुई कॉल हर बेबी अँड आय पर्सनली कॉल हर ओन्ली बाय वन लेटर बी !'

कमान्डन्टचा साफ मामा बनवून टाकला वसंतरावांनी आपल्या खुलाशानं आणि अभिनयानं. गळा दाटून येऊनच ते खुलासा करीत होते. दहा दिवसांची कॅज्युअल मंजूर केली आहे हे कमाडन्टचे शब्द कानावर पडताच वसंतरावांनी प्रथम तारेचं औद्वदेहिक करून टाकलं. तडक दिब्रुगडपर्यंतचा कन्व्हॉय शोधण्यास निघाले. नेफातल्या सेवेकऱ्यांना रजा मंजूर झाली तरी ती ऑफिस सोडल्या दिवसापासून मोजीत नाहीत. दिब्रुगढला गाडीत बसल्या क्षणापासून

मोजतात.मेडिकल युनिटचा कन्व्हॉय सर्वात आधी दिब्रुगढला पोचतो हे वसंतरावांना ठाऊक होतं. त्यांनी तो मिळविला आणि मग यथावकाश लखनौच्या प्लॅटफॉर्मवर पाऊल टाकलं. बेगमसाहेबा स्वागताला हजरच होत्या तिथं. पहिलं हास्य विरताच वसंतरावांनी सवाल केला,

'ये क्या कोई तरीका होता है टेलिग्रामपर सिग्नेचर करनेका?'

'क्यूं? क्या हुआ?'

'सिर्फ 'बी' क्यों लिखा आपने?'

'तो क्या बेगम अख्तरी लिखूं? आप भी खूब है देशपांडेजी.'

'मेरा पूछनेका मतलब वो नही. कोई पड़ोसीका नाम क्यू नही लिखा? कमाण्डन्टको जरूर शक आया.'

'सच?'

'नही तो क्या झूठी बात कर रहा हूँ? और एक दूसरी भी गलती-'

'कौनसी?'

'मैं तो पूनेका रहनेवाला. आपने टेलिग्राम भेजा लखनौसे- !'

'मजबूर हूँ देशपांडेजी. लखनऊका डाकघर पूना का शिक्का कैसा मार सकता? लेकिन गाँव का नाम पढ़ा तो नहीं कमाण्डन्टने?'

'हमारी खुश किस्मतीसे नहीं पढ़ा, वरना....'

'मैंने समझा खाली कंन्टेन्टस् पढते है अफसर लोग, मुझे क्या मालूम इतने डीटेल्स देखते है ? कुछ भी हो. छुटी तो मिली आपको?'

'हां हां, छुट्टी मिली.'

'कितने दिनकी?'

'दस !'

बेगम अखतर आनंदून गेल्या. प्रवासाचे दोन दिवस वगळता वसंतराव आठ दवस अखतरी बाईंच्या दौलतखान्यात राहू शकले. काय ती खातिरदारी बाईंची! मैफिल चालू असेतो (आणि त्या आठ दिवसात ती अनिर्बंधच चाले) चारी बाजूला चार माणसं नुसती पानं लावायला बसवली होती बाईंनी! शिकवून तयार केलेल्या सगळ्या विद्यार्थिनींची गाणी ऐकविली बाईनी. एकेकदा नव्हे अनेकदा. अखतरी बाईंचे यजमान पराकाष्ठेचे धार्मिक. दिवसातून पाचदा नमाज पढायचे. घरात चांदीच्या भांड्यांची थप्पी लागलेली असताना कटोऱ्यातून पाणी प्यायचे. लखनऊ शहरात गायची बंदी होती बाईंना. बाकी हिंदुस्थानभर नव्हती. त्या आठ दिवसात मनसोक्त गाणं ऐकलं बाईचं वसंतरावांनी आणि स्वतःचंही तेवढंच ऐकवलं. कसे उडाले आठ दिवस कळलंही नाही. स्वरसरोवरात पोहतो आहोत आणि 'कमलापरि मिटति दिवस उमलूनी तळ्यात' अशीच जगाची अवस्था आहे असं वाटत होतं त्याना. आठ दिवसांनी वसंतराव एका स्वप्नातून वास्तवात आले. लखनौ स्टेशनवर 'अलबिदा' करायला बेगमसाहेबा आल्याच होत्या. पुनः पुन्हा बजावित होत्या, 'देशपांडेजी कुछ भी करो लेकिन ये नौकरीका इस्तिफा दे दो !' **– संकलित**

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या**
**ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**मंगळवार, दि. 15 : पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231-2546585**

# म्हणींचे म्हणणे

## वरातीमागून घोडे

आज घरात सगळ्यांचीच धावपळ चालली होती. पाहुणे येणार होते. सत्यनारायणाची पूजा होती. नंदाआत्या, सरला मावशी, भालचंद्र मामा, दिगू काका, निमा काकू सगळे घरचे लोक आपआपली ठरलेली कामं करण्यात रमले होते. गप्पा, गडबड, धावपळ चालूच होती.

इतक्यात गोदाक्काने हाक मारली. 'सरला, पूजेची नीट तयारी झाली आहे ना बघून ठेव. चौरंग, फळं, फुलं, तुळशीपत्र, नारळ, ओटीचं सामान. आणि हो, मुख्य म्हणजे केळीचे खांब. पूजा मांडायच्या आधी ते खांब नीट व्यवस्थित लावून घे मुकुंदाकडून ! सुंदर रितीने पूजा मांडली की मनाला समाधान मिळतं. गोदाक्काच्या सूचना संपल्या असं समजून सरला तयारीला लागली.

स्वयंपाकघरातही सगळ्यांची लगबग चालूच होती. स्वयंपाक करायला माधुरी काकू आली होती त्यामुळे इतर पाहुण्यांशी बोलायला घरच्या बायकांना जरा निवांत वेळ मिळाला. पक्वान्नाचा बेत अगदी मस्त जमून आला होता.

एकूणच घरातली सगळी माणसं आपआपल्या कामाला लागली. सरलाने आबाला हाक मारली आणि बजावलं, 'हे बघ आबा, बाकी सगळी तयारी बाहेरच्या रुममधे ठेवली आहे. केळीचे खांब तेवढे मंडईतून आणायचे राहिलेत. काल दिगूकाका गेला होता, पण त्याला मिळाले नाहीत. म्हणून आत्ता तू जा. भटजीकाका १२ च्या आसपास येतील, मग खरी सुरुवात होईल. त्याआधी ते खांब लावून झाले पाहिजेत. ऐकतोयस ना?' आबा मानेने 'हो' म्हणाला, अन् चप्पल घालून निघून गेला.

छोटा निखील हे सगळं अवतीभवती घडणारं मनातल्या मनात टिपून घेत होता. या सगळ्याची त्याला मजा वाटत होती. आईनं स्वच्छ अंघोळ घालून 'नवीन कपडे घालायचेत हं' असं सांगितल्यापासून गडी एकदम खूष !!

कुठलही गोष्ट, कार्यक्रम हा नियोजन, पूर्वतयारी केल्यामुळे व्यवस्थित पार पडतो हे संस्कार अशाच छोट्या मोठ्या प्रसंगातून पुढच्या पिढीला मिळत असतात. नकळत पुढची पिढी शिकत जाते. अनुभवांची शाळा अशीच असते.

भालचंद्र हॉलमध्ये बसला होता. इतक्यात निमा तिथे आली. त्याला म्हणाली, 'दादा हॉलमधले सामान थोडे आवरून घ्यायचे होते. म्हणजे नंतरची मांडामांड करणं सोप जाईल. एकदा भटजी काका आले मग आणखीच गडबड उडेल. चल जरा मदत कर बघू.'

'अरे... हो हो, करूया की. चल सांग काय काय करायचय?' असं म्हणत दोघंही कामाला लागली.

हे सगळं आवरेपर्यंत कसा वेळ गेला कळलच नाही. आबालाही जाऊन खूप वेळ झाला होता. मंडईतून अजून आला कसा नाही, म्हणून सरलाची घालमेल चालली होती. ह्याला ना, कधीही एखादे काम सांगावे, ते वेळेवर झाले तर शपथ!! सरलाची बडबड सुरू झाली आबा आला नाही म्हणून. आणि आता गोदाक्काला कळलं तर आपलं काही खरं नाही म्हणून चीडचीड. सारखं आतबाहेर, आतबाहेर करत राहिली. बरं फोन करावा तर फोन पठ्ठ्याने घरातच ठेवलेला. म्हणजे तो ही मार्ग बंद. तिचं तिलाच कळेना. मनातल्या मनात संताप चालला होता. होय नाय करत गोदाक्काच्या कानावर हे गेलच. पण इतक्यात कुणीतरी भटजी आल्याचे सांगितले. अन् सगळे मग तिकडे तयारीला वळले. गोदाक्का हॉलमध्ये आली. बाकी सगळी मांडामांड व्यवस्थित झालेली तिला दिसत होती, पण चौरंगाच्या बाजूला मोकळी जागा दिसली. झालं ! ती सरलाला हाक मारत घरात गेली.

'सरले, सरले, काय करतेयस? तुला काय सांगितले होते? आधी काम कुठलं करावं काय याचं काही भान आहे की नाही? अगं भटजीनी येऊन पूजेची मांडणी केली, पण अजून केळीचे खांब काय चार आणता आले नाहीत वेळेवर... याला म्हणतात वराती मागून घोडं... ! म्हणजे घोडा कशाला मागवलेला होता? नवरा नवरीला बसवून फिरवायला. पण

(पुढील मजकूर पान २३ वर पाहा...)

# घरकाम करता-करता लंडनमध्ये अस्सल मराठी आजीबाईंची खानावळ

१९५० च्या दशकात राधाबाई वनारसे (पूर्वाश्रमीच्या राधा डोमाजी डहाके) या लंडनला गेल्या, आणि घरकाम करता करता त्यांनी भारतातून तिकडे गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'आजीबाईंची खानावळ' सुरू केली. पुढे काही वर्षांनी ही खानावळ तेथील सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बनले. या राधाबाई वनारसे यांच्या जिद्दीची ही कहाणी.

यवतमाळ च्या रस्त्यावर भाजी विकणारी एक निरक्षर विधवा महिला. ५ मुली पदरात आणि अठराविश्वे दारिद्र्य घरात. अचानक एक दिवस इंग्लंडहून तिच्याच समाजातील एक माणूस उगवला. त्याची बायकोही नुकतीच देवाघरी गेली होती. समाजातील प्रथेप्रमाणे दुसरे लग्न करणे भाग होते. मग कोणा मध्यस्थाने दिला या दोघांचा पाट लावून.

नवीन नवरा हिला घेऊन बोटीने लंडनला गेला. बरोबर पाचातल्या दोन मुली घेतल्या. बाकीच्यांना नातेवाईकांच्या भरवशावर इथेच ठेवले. तिथे त्याच्या मुलांनी हिला ठेऊन घ्यायला नकार दिला. मग कसाबसा हा अजब संसार चालू राहिला. एक दिवस आकाश कोसळले. थोड्या आजाराचे निमित्त होऊन नवऱ्याचा मृत्यू झाला.

लंडनमध्ये आबाजींच्या विठ्ठल आणि पांडुरंग या विवाहित मुलांना वडलांचे हे दुसरे लग्न पसंत नसल्यानं राधाबाईंचे लंडनमध्ये थंडे स्वागत झाले. घरात राबायला एक गुलाम मिळाला, यापलीकडे त्यांना कुणी गृहीत धरले नव्हते. आबाजींची मुले तिथं लॉजिंग-बोर्डिंग चालवत होती. भारतातून शिक्षण व नोकरीसाठी लंडनला आलेल्या भारतीयांना निवारा आणि त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था ते करीत असत. सावत्र नातवंडे राधाबाईंना 'आजी' म्हणून हाक मारीत. साहजिकच इतरही लोक त्यांना 'आजी' म्हणू लागले. एकीकडे घरात गुलामासारखे राब राब राबत असताना आजीबाई हळूहळू तिथली भाषा, संस्कृती, माणसे यांच्याशी परिचित होत गेल्या.

त्यांच्या हाताला चव होती. त्यामुळे त्यांच्या खाणावळीला बरकत येत गेली. परंतु अचानक आबाजी गेले आणि बनारसे आजी पुन्हा रस्त्यावर आल्या. सावत्र मुलांनी त्यांना घराबाहेर काढले. नंतर काही दिवसातच घरातल्यांनी ह्या बाईच्या हातात बोटीची ३ तिकिटे आणि ५० पौंड ठेवले आणि घराबाहेर काढले. ते ही ऐन हिवाळ्यात !

बाईंच्या हाताला धरून दोन लहानग्या मुली, एक वळकटी आणि जेमतेम चार इंग्रजी शब्द, यावर ही अशिक्षित ९ वारी नेसलेली बाई लंडनच्या बर्फात सुन्न होऊन उभी होती. एका जवळ राहणाऱ्या भल्या ज्यू माणसाने तिला घरी नेले आणि कसाबसा संवाद साधत तुला काय येते विचारले.

ही म्हणाली, स्वयंपाक. त्याने हिला आपल्या घरातील मोकळी जागा दिली आणि म्हणाला मग कर स्वयंपाक. तुझ्या देशातले लोक येतील बघ खायला. आणि असा 'आजीबाई वनारसे खानावळ' या लंडनमधल्या खानावळीचा जन्म झाला.

त्याकाळी भारतातून येणारी कला क्षेत्रातील मंडळी, यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधींसारखे नेते आजीबाईंच्या या कर्तबगारीने प्रभावित झाले होते. आजीबाईंच्या अविश्रांत कष्टांना यश येऊन त्यांना स्थैर्य, पैसा, प्रसिद्धी, नावलौकिक प्राप्त होत गेला. त्यांच्या मालकीच्या अनेक इमारती लंडनमध्ये उभ्या राहिल्या. लंडनमध्ये मंदिर बांधून भारतीयांना एकत्र येण्यासाठी त्यांनी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. लंडनच्या महाराष्ट्र मंडळाच्या पायाभरणीत आणि तिथल्या सांस्कृतिक उपक्रमांना आकार देण्यातही आजीबाईंचा मोलाचा वाटा आहे. 'भारतीयांचा लंडनमधील आधारवड' ही त्यांची ओळख त्यातून दृढ होत गेली.

आजही त्यांच्या मृत्यूनंतर लंडनमधील भारतीयांच्या मनात अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना अढळ स्थान आहे.

पु.लं., अत्रे, यांच्यापासून अनेक मराठी दिग्गज त्यांच्याकडे राहून, जेऊन गेले. बाई ९ वारी साडी नेसून लंडन च्या मेट्रोने एकट्या प्रवास करीत (शेवटपर्यंत त्या ९ वारी साडीच नेसत होत्या) स्टेशनची नावे वाचता येत नसत म्हणून कितवे स्टेशन ते विचारून घेत आणि मोजून उतरत. बाई वारल्या तेव्हा त्यांच्या मालकीची लंडनमध्ये ५ घरे होती. लंडनमधला गणेशोत्सव त्यांनी चालू केला. तिथले पहिले देऊळही त्यांनीच बांधले.

तिनं जीवनाचा निरोप घेतला, तेव्हा तिच्या शवावर वाहण्यासाठी लंडनच्या गोऱ्या मेयरनं... मेयर ऑफ बारनेटनं फुलं पाठवली. त्यांच्या अंतयात्रेला राणीचा प्रतिनिधी म्हणून लंडनचा मेयर हजर होता. आणि लंडनमधल्या तिच्या भारतीय मुलांनी तिची शवपेटी प्रेमपूर्वक आपल्या खांद्यावर वाहून नेली, आणि सगळ्यात गम्मत म्हणजे त्या शेवटपर्यंत अशिक्षितच राहिल्या. जेमतेम RDHBI अशी सही करीत.

# १२ वर्षांतून येणारा ‘श्रावण’ अधिक मास

आपले सण, उत्सव, व्रते आणि उपासना वगैरे चांद्रमासाप्रमाणे म्हणजे चंद्राच्या गतीवरून ठरविलेले आहेत. ठराविक महिन्यात किंवा ठराविक ऋतूतच यावेत म्हणून दोन्ही प्रकारच्या कालगणनेत मेळ घालण्यासाठी पंचांगकर्त्यांनी दर तीन वर्षांनी चांद्रमासाचा एक महिना ‘अधिक’ म्हणून ठरविला आहे.

या अधिक मासाचे ‘मलमास’ असे नामकरण झाले. या महिन्यात मंगल कार्याऐवजी पुण्यकार्य करण्यासाठी प्राचीन काळी भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना सांगितलेल्या कथेने परमश्रेष्ठ श्रीकृष्णाकडे विष्णूंनी मलमासाची व्यथा सांगितल्यावर श्रीकृष्णांनी या मासाला स्वत:चे नाव – पुरुषोत्तम मास – असे देण्याचे पौराणिक उल्लेख आढळतात. दर तीन वर्षांनी अधिक महिना येतो म्हणजे त्या वर्षात १२ ऐवजी १३ वा महिना येतो. तो एक प्रकारचा धोंड म्हणून त्याला ‘धोंड्याचा महिना’ असेही संबोधतात. अधिकमासाला ‘मलमास’ किंवा ‘मलिचल्लू’ असेही संबोधतात.

मराठी भारत वर्षांत चैत्र महिन्यापासून अश्विन महिन्यापर्यंत एकदा तर कधीकधी फाल्गुन हा महिनाही अधिक मास म्हणून येतो.

दर महिन्यात सूर्य एकेका राशीतून संक्रमण करतो. परंतु ज्या महिन्यात सूर्य कोणत्याही राशीतून संक्रमण करीत नाही, तो महिना ‘मलमास’ म्हणजेच ‘अधिक मास’ म्हणून धरतात. दर अठरा वर्षांनी तोच महिना पुन्हा अधिक महिना म्हणून येतो. चांद्रवर्ष व सौरवर्ष यांचा मेळ घालण्यासाठी सरासरी बत्तीस किंवा तेहत्तीस चांद्रमासानंतर चांद्रवर्षात एक अधिक महिना धरावा लागतो.

कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ हे कधी क्षयमास होतात. पंचांगात हे महिने नसतात, अशा वर्षांत अधिक मास दोन वेळा येतो. क्षयमासापूर्वीचा अधिक मास पुण्यकर्त्यांना वर्ज्य. त्यानंतर येणारा दुसरा अधिकमास हाच ‘पुरुषोत्तममास’ म्हणून शास्त्रकर्ते मानतात. अधिक महिन्यात सूर्य संक्रांत नसते. अशावेळी चंद्र–सूर्याच्या गतीत फरक पडतो. म्हणून वातावरणात ग्रहण काळाप्रमाणे विशेष असा बदल संभवतो. या कालावधीत भगवान पुरुषोत्तम श्रीकृष्णाचे पूजन माहात्म्य सांगितले आहे.

प्राचीनकाळी निमिष नावाच्या अरण्यात तपोभूमीवर अनेक ऋषीमुनी यज्ञ कार्यासाठी एकत्र येत. त्यावेळी व्यास महर्षींचे शिष्य ‘सूत’ मोठे पुराणिक होते. त्यांना शौनक नावाच्या ऋषींनी या व्रत उद्यापनाविषयी विचारलेल्या विविध शंका प्रश्नांमध्ये सूतांनी अधिक माहात्म्य सांगितल्याचे संदर्भ आढळतात. पद्मपुराण, देवी भागवत यामध्ये अधिकमासाचे उल्लेख आढळतात.

चांद्रमासाचे वर्षाचे दिवस आणि सौरवर्षाचे दिवस यांचा मेळ घालण्यासाठी दर तीन वर्षांनी म्हणजे सुमारे साडेबत्तीस महिन्यांनी हा कालावधी ३२ महिने १६ दिवस ४ घटीकांचा एक महिना जास्त धरतो. त्याला ‘अधिक मास’ म्हणतात.

‘दुष्काळात १३ वा महिना’ अशी म्हण या प्रवृत्तीतूनच तयार झाली आहे. मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन यांना जोडून अधिक महिना सहसा येत नाही. सर्वसाधारणपणे १२ वर्षांनी चैत्र, ज्येष्ठ, श्रावण महिन्यात अधिक मास येतो. १८ वर्षांनी ‘अधिक आषाढ’ तर दर २४ वर्षांनी एकदा ‘अधिक भाद्रपद’ येतो. १४१ वर्षांनी अश्विन अधिक मास येतो, तर ७०० वर्षांनी कार्तिक अधिक मास येतो. भाद्रपदापर्यंतच्या मासांना अधिक मास म्हणतात. अश्विन व कार्तिक अधिक आले तरी त्यात तसे म्हणत नाहीत. ज्यावर्षी अश्विन अधिक येतो. त्यावर्षी पौष क्षयमास होतो. अशावेळी दोन प्रहरापर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहारांना पौषमास गृहित धरून धार्मिक कृत्ये करतात.

३५५ दिवसांचे ‘चांद्रवर्ष’ आणि ३६५ दिवसांचे ‘सौरवर्ष’ यांचा मेळ घालण्यासाठी या अधिक मासाची निर्मिती झाली हे निश्चित. अधिक मासाला ‘प्राकृत’ आणि ‘संसर्प’ अशाही नावाने ओळखतात.

या मासाची पुरुषोत्तम म्हणजे विष्णू ही देवता मानली असून त्याच्या कृपेसाठी पुढील कृत्य करण्यास सांगितले आहे. पूजा, पापक्षालनासाठी मलमासव्रत, प्रत्येक दिवशी अनारसे इ. पक्वान्ने तेहतीस या संख्येने कांस्यपात्रात भरून पात्रासह त्यांचे दान, पादत्राणे व छत्री यांचे दान, सुवर्णदक्षिणा इ. महाराष्ट्रात अधिकामासातले

अनारशांचे वाण बहुधा जावयाला देतात. कन्या व जामात यांना लक्ष्मीनारायण स्वरूपी मानले आहे. त्यातून ही पद्धत आली असावी.

भगवान नारायणांनी नारदाला, विष्णूंनी लक्ष्मीला, श्रीकृष्णांनी पांडवांना अधिक मासाचे महत्त्व सांगितल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात. सर्व कथा व्यासमुनींनी लिहून ठेवलेल्या बृहन्नारदीय पुराण आणि पद्मपुराणात हे संदर्भ आढळतात. पांडवांनी हैहय प्रांतातील दृढधन्वा राजा आणि राणी गुणक्षुरटी त्याचप्रमाणे सौभाग्य नगरातील चित्रबाहू राजा आणि धर्मशर्मा यांनी अधिकमास व्रत केल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात.

वर्षभर श्रम केल्यामुळे सर्व ऋतू आपली गती करून या कालावधीत सूर्याचा पाहुणचार घेतात, असे ऋग्वेदात म्हटले आहे.

अधिक मास माहात्म्य नावाची प्राचीन पोथी एकूण ३३ अध्यायांनी नटलेली आहे. आजही या पोथींचे गावोगावी, मंदिरात, सार्वजनिक ठिकाणी, सभागृहात, खेड्यापाड्यातून वाचन होते. ऋषीमुनींचा मेळावा, मलमास कथा, दुर्वासमुनी मेधावती भेट, दृढधन्वा राजाची कथा, सुदेव गौतमी कथा, शुक्रदेव पुत्रकथा, नृगराज उद्धार, चित्रबाहू राजाची कथा, मौनव्रत, पंचपर्व, स्मित विलासिनीची कथा,धर्मशर्माची कथा, विप्रदास, सोमशर्मा, काशीदेवता, उद्यापन विधी, सुमती राजाची कथा, कार्द्याची कथा, नर-वानराचा उद्धार आदि कथांचा समावेश मूळ अधिक माहात्म्य ग्रंथात आहे. या अधिकमासात गोग्रास, अपूपदान, दीपदान वगैरे दान माहत्म्य सांगितलेले आहे. छिद्र असणारे पदार्थ म्हणजे अनारसे, बत्तासे वगैरे वस्तू ३०+३ (तेहतीस) अशा प्रमाणात दान करण्याची प्रथा आढळते. ही दाने काश्य धातूच्या भांड्यातून करावीत. दांपत्यभोजन, आवळी स्नान आदि व्रते आहेत.

वेदाच्या ज्या भागात अधिकाचा उल्लेख आहे तो सन १५०० वर्षाच्या सुमाराचा असावा, असे जाणकारांचे म्हणणे आहे. अधिक मास धरण्याची पद्धती भारतात प्रचलित असावी, असे वाटते. प्राचीन काळापासून शुद्ध प्रतिपदेला देवासमोर पाट, कलशपूजन, पुरुषोत्तम राधिकेसह श्रीकृष्ण मूर्तींची पूजा संकल्पयुक्त करून व्रत आरंभ करावा. अधिक कृष्ण अमावास्येला व्रत उद्यापन करावे.

या मासात अग्लाधान, देव प्रतिष्ठा, राज्याभिषेक, विवाह, उपनयन, गृहारंभ, गृहप्रवेश व देशांतर यात्रा यांना वर्ज्य काळ ठरविले आहे. अधिक मासात मृत झालेल्यांचे श्राद्ध व महालय श्राद्ध मासात ज्या त्या तिथीला करतात.

**- नंदकुमार मराठे,**
मोबा.


### योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे - 8275606627,**
**श्री. रोहित गवळी - 9657963475**


## वरातीमागून घोडे

**(पान नं. २० वरून पुढे...)**

असतात काही काही महाभाग. ते सगळं कामधाम आटपलं की येतात आधीची तयारी करायला. वरात जाते चालत चालत पुढे आणि यांचा घोडा मागून रिकामा दिवा... कसं होणार आहे पुढं ! तूच बघ आता बास.'

आता खरी तोंडपूजा आबाची होणार हे घरच्यांनी जाणलं. सरला बिचारी आपणच घोडं आणलं नाही अशा भावनेनं खाली मान घालून उभी.

चला आरतीला, भटजींनी पुकारा केला. आरती झाली. नैवेद्य दाखवून आता पंगत बसणार एवढ्यात आबा केळीचे खांब घेऊन आला. छोटा निखिल धावत धावत जाऊन गोदाक्काला मोठ्यांदा म्हणाला, 'गोदाआजी, तुझे वराती मागून घोडे आले गं...'

त्याच्या या वाक्यावर सगळे जोर जोरात हसले !

**- वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर
# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२३-२०२४
(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**
मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक.

१२. **इ.४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय) – अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation)

१८. गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी – इ. १० व १२ वी

१९. **इतर –** वक्तृत्व,संगीत, पाककृती

२०. **पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - ऑगस्ट २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सायली<br>--- | कऱ्हाडे | १२/८/९३<br>५.३ | कौशिक, वृषभ, रोहिणी, १ ले मनुष्य, अंत्य | B.A. + Agri. Diploma | --- | --- | सौ. संध्या जयंत लळीत<br>मु.पो.गिर्ये (करंजईवाडी)<br>ता.देवगड. ८३७८०१०८२३ |
| २. | ममता<br>B +ve | देशस्थ | ३०/७/९२<br>५.३ | वसिष्ठ, कर्क, आश्लेषा, ३ रे अंत्य, राक्षस | MCA DCL | --- | --- | जीवनभाई अनंतराव जोशी<br>सासने कॉलनी, कोल्हापूर<br>९४०३४६५२७६ |
| ३. | कीर्ती<br>O +ve | देशस्थ | २/११/९१<br>५.७ | भारद्वाज, सिंह, उत्तरा, १ ले आद्य, मनुष्य | B.Tech. | --- | --- | मोहन कानडे<br>मु.पो.पोखले, ता.पन्हाळा<br>९६३७८१११७६ |
| ४. | प्राची<br>--- | कोकणस्थ | २६/१२/९६<br>५.३ | कौशिक, मिथुन पुनर्वसू, २ रे आद्य, देवगण | M.A. | --- | --- | शेखर जयंत आपटे<br>मु.पो.कसबे डिग्रज, जि.सांगली<br>८६०००८२००४ |
| ५. | भक्ती<br>O +ve | देशस्थ | १४/२/९७<br>५ फूट | वसिष्ठ, वृषभ कृतिका, अंत्य | B.E. C.Dac. | नोकरी | वा.प्रा. ७ लाख | भक्ती गजानन कुलकर्णी<br>सांगली.<br>८८०६२९११०५ |
| ६. | इरावती<br>O +ve | देशस्थ | १३/२/९८<br>५.३ | वसिष्ठ, सिंह, पूर्वा, ३ रे मध्य, मनुष्य | BSL LLB LLM | --- | --- | विद्याधर विनायक जोशी<br>खासबाग, कोल्हापूर<br>९४२२४१५६२० |
| ७. | डॉ.आर्या<br>B +ve | देशस्थ | १/७/९४<br>५.२ | गार्ग्य, मीन, रेवती, १ ले अंत्य, देवगण | B.A.M.S. MD | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६.९५ लाख | सतीश कुलकर्णी<br>पाचगांव रोड, कोल्हापूर<br>९३२५६९९९१० |
| ८. | वर्षा<br>O +ve | देशस्थ | १/१/९५<br>५.२ | भारद्वाज, धनू मूळ, १ ले मध्य, मनुष्य | M.Com. | --- | --- | शिला कुलकर्णी<br>मु.पो.कळविकट्टे,कोल्हापूर<br>७६६६५२७४३४ |
| ९. | ऋतुजा<br>O +ve | देशस्थ | ९/६/९८<br>५.१ | विष्णूवर्धन, वृश्चिक अनुराधा, ३ रे मध्य, देवगण | B.B.A. M.B.A. | इचलकरंजी येथे नोकरी | वा.प्रा. २.५ लाख | प्रसाद देशपांडे<br>मु.पो.इंगळी<br>९३५९४१०२७१ |
| १०. | प्राजक्ता<br>B +ve | गौड सारस्वत | ६/८/९२<br>५.१० | कौंडिण्य, वृश्चिक अनुराधा, १ ले मध्य, देवगण | B.M.S. M.M.S. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ८ लाख | प्रसन्नकुमार बोरकर<br>मुंडवा, पुणे.<br>९७६९२८०११७ |

**यशश्री गणेश राव**

**जन्मतारीख :** १८/११/२००० **पोटशाखा :** देशस्थ

**शिक्षण :** B.Sc. (BCS) Pursuing M-Tech & Com bits

**रक्तगट :** O +ve **उंची :** ५.१

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** २.६४ लाख

**पत्ता : श्री. गणेश अशोक राव,** ताराबाई रोड, कोल्हापूर.

मो. 9511858290, 8208052425

**अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी कुटुंब असावे.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | कर्क | आश्लेषा | ४ थे | --- | राक्षस |

**वृषाली विनायक अष्टेकर (देशस्थ) रक्तगट :** B +ve

**जन्मतारीख :** १०/५/१९९८ **उंची :** ५.२

**शिक्षण :** एम.ए. (इंग्रजी) व एम.ए. (भरतनाट्यम् विशारद, पूर्ण)

**नोकरी :** --- **वा.प्रा. :** ---

**पत्ता : श्री. विनायक शामराव अष्टेकर**

मंगळवार पेठ, महालक्ष्मी बँकेसमोर, कोल्हापूर.

मोबा. 9403576638, 9423826455

**अपेक्षा :** शक्यतो कोल्हापूर, वयातील अंतर ० ते ३ वर्षे असावे

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वत्स | तूळ | स्वाती | २ रे | अंत्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - ऑगस्ट २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विवेक (घटस्फोटीत) | देशस्थ | ७/१०/८२ ५.१ | शांडिल्य, वृषभ रोहिणी, २ रे अंत्य, मनुष्य | B.Com. | महालक्ष्मी बँक कोल्हापूर | मा्रा.प्रा. ३५,०००/- | विजय नारायण राव फुलेवाडी, कोल्हापूर. ९७६४१५८५२५ |
| २. | मकरंद --- | देशस्थ | ८/५/८१ ५.८ | वसिष्ठ, मिधुन पुनर्वसू, २ रे आद्य, देवगण | B.A. | नोकरी कोल्हापूर येथे | मा.प्रा. ५०,०००/- | मकरंद महादेव आराध्ये कोल्हापूर. ७०८३१८३७४५ ९८५०५७८५६७ |
| ३. | डॉ.ओमकार --- | कऱ्हाडे | २१/१०/८६ ५.६ | नैध्रुव, वृषभ रोहिणी, १ ले अंत्य, मनुष्य | BDS/MDS Super-Speciality Inplantology | व्यवसाय क्लिनिक ठाणे | वा.प्रा. १२ लाख | विनायक भा. पाध्ये ठाणे/पुणे. ९८६९०२०७५९ ९८२०९०९९८१ |
| ४. | लौकिक O +ve | देशस्थ | २५/६/८४ ५.११ | वसिष्ठ, मेष, भरणी, १ ले मध्य, देवगण | B.Com. | स्वत:चा व्यवसाय | मा.प्रा. ६०,०००/- | लौकिक रमेश आबादे पुणे. ९८८१५७३६०५ ९४२००१३८७० |
| ५. | अनिरूद्ध O +ve | कोकणस्थ | १/१/८५ ५.५ | भारद्वाज, मेष, अश्विनी, ४ थे आद्य, देवगण | B.A. M.Lib. N.E.T.S.E. | सांगली येथे नोकरी (मणक्यात दोष) | वा.प्रा. ५ लाख | रघुनाथ सदाशिव देशपांडे दुधगांव, सांगली. ९९७५७३९३४५ |
| ६. | परशुराम O +ve | देशस्थ | २१/५/८५ ५.९ | हरित, वृषभ, मृग, १ ले मध्य, देवगण | MCA | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | प्रणिता प्रदीप कुलकर्णी कोल्हापूर. ९७६६९४९६९३ ९९७५२५५७५० |
| ७. | अमोल A +ve | देशस्थ | ५/८/९४ ५.११ | काश्यप, मिथुन पुनर्वसू, २ रे आद्य, देवगण | B.E. | बेंगलोर येथे नोकरी | वा.प्रा. १७ लाख | चंद्रशेखर विश्वनाथ कोडोलीकर कोल्हापूर. ९९६०६४६४२१ ९९६०५०२२६५ |
| ८. | नचिकेत B +ve | कऱ्हाडे | ३०/४/९७ ६ फूट | गौतम, मकर, श्रवण, ३ रे अंत्य, देवगण | M.Com. TCA Course | पुणे येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. ३ लाख | मकरंद मुळ्ये मु.पो.वाई, जि.सातारा ७५८८३३५६५२ |
| ९. | आशिष --- | कोकणस्थ | ४/१/९६ --- | शांडिल्य, वृषभ, मृग, २ रे मध्य, देवगण | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १२ लाख | जगदीश सोमण नारायण पेठ, पुणे. ९३२२०६८६६२ |
| १०. | सुमित --- | देशस्थ | २४/२/९० ५.७ | काश्यप, मकर, धनिष्ठा, २ रे मध्य, राक्षस | B.E (Mech) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६.२९ लाख | सुनेत्रा श्री. सबनीस कोल्हापूर. ९८२३८७७२६० ९८८१६६०२७५ |

### स्वानंद सदानंद मराठे (कोकणस्थ) विधुर

**जन्मतारीख :** ८/५/१९८६ **उंची :** ५.२ **रक्तगट :** B+ ve

**शिक्षण :** B.Com., M.B.A.

**नोकरी :** TJSB (सहकारी बँक) **वा.प्रा. :** ८ लाख

**पत्ता : सदानंद दिनकर मराठे**

बाबुजमाल तालीम मंडळ, कोल्हापूर.

मोबा. 9975429494, 9960636040

**अपेक्षा :** कोणत्याही पोटशाखेतील, मुलासह स्वीकारणारी

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कपी | मेष | मघा | १ ले | मध्य | मनुष्य |

### कैवल्य राजेंद्र शास्त्री (देशस्थ) रक्तगट : O +ve

**जन्मतारीख :** १६/४/१९९६ **उंची :** ५.७

**शिक्षण :** B.E. (Prod), ADIS, MBA, Operation Manager.

**नोकरी :** जवाहर साखर कारखाना, हुपरी **वा.प्रा.** : ५ लाख

**पत्ता : राजेंद्र रामचंद्र शास्त्री**

जनता पतसंस्थेसमोर, हुपरी, कोल्हापूर.

मोबा. 9922810601, 8623035464

**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | मीन | उ.भाद्र | १ ले | मध्य | मनुष्य |




**कोल्हापूर चित्पावन संघ आणि We For Ours युवा मंच आयोजित**

# दशावतारी लोकनाट्य 'राजकिरीट'

**आपल्या गावात कोकणातील लोकनाट्य पाहण्याची सुवर्ण संधी !**

**दिनांक : २९ जुलै २०२३ (शनिवार) वेळ : संध्याकाळी ६.३० ते ८.३० (विना विश्रांती)**

**ठिकाण : राम गणेश गडकरी सभागृह, पेटाळा, खरी कॉर्नर.**


दशावतारा बद्दल थोडक्यात दशावतार हा लोकनाट्य प्रकार तळकोकणात जास्त प्रचलित आहे. हे गावच्या जत्रा, पूजा, शिमगा, पाडवा अशा पवित्र प्रसंगी कोकणात हे लोकनाट्य सादर होते. यात पुराणातील कथामधील ठराविक प्रसंग घेऊन त्यावर नाट्य सादर केले जाते. यात कलाकार स्वत: गाणी म्हणतो, युद्धात तलवार, गदा वापरून गाण्यावर विशिष्ट ताल धरला जातो. हे नाटक मंदिरात, अंगणात असं कुठेही साधा लाईट लावून सादर होते. कोकणातील लोकांच्या मनात कित्तेक वर्षां पासून दशावतारने घर केलंय आणि ते अजूनही अबाधित ठेवण्यात हे कलाकार यशस्वी झाले आहेत. ही कथा सुरू होते महाभारताचे युद्ध संपल्या वर. कौरवांवर विजय मिळवल्या मुळे भिमाचा गर्व वाढलाय आणि तेव्हाच नारद त्याला एक कौरव शिल्लक आहे आणि तो हस्तिनापुराचे राजकिरीट घेऊन पळून जातोय असं सांगतो. तो कौरव म्हणजे दुर्योधनाचा नातू सुशर्म्य असतो ... इथून पुढे काय होते हे पहायला नक्की या... त्वरा करा मर्यादित प्रवेशिका उपलब्ध.

**प्रवेशिका मिळण्याचे ठिकाण :-**
कोल्हापूर चित्पावन संघ ऑफिस,
गुरुमहराज वाड्याजवळ, कोल्हापूर.
प्रवेशिका मूल्य : रु. ५०/- प्रत्येकी.
ऑफिस संपर्क : ७६२०५४६२२५,
०२३१-२५४६२२५

## प्रवेशिकांचे अनावरण



या अनावरण प्रसंगी केदार जोशी, अमेय गोखले ,ऋषिकेश लिमये ,महेश पटवर्धन ,अमित आपटे, महेश आपटे ,निनाद खरे,निखिल जोग शुभम साने ,वेदा आपटे, मृणालिनी आपटे ,संतोष साने उपस्थित होते




# मंजुश्री गोखले यांची नवी कादंबरी 'समर्थ' प्रकाशित

यवनांच्या अत्याचारांना विरोध करण्यासाठी आणि छ. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य संकल्पनेला पूरक असे समाजमन तयार करण्यासाठी रामदास स्वामींनी अथक प्रयत्न केले. यवनांना प्रतिकार म्हणून ठिकठिकाणी मारुतीची मंदिर आणि व्यायामशाळा काढल्या. हा फोकस ठेवून लिहिलेली आणि रामदास स्वामींचं संपूर्ण जीवन अधोरेखीत करणारी मंजुश्री गोखले यांची नवी कादंबरी 'समर्थ' नुकतीच प्रकाशित झाली. पुण्याच्या मेहता पब्लिशिंग हाऊसने ही कादंबरी प्रकाशित केली आहे. मंजुश्री गोखले यांचे हे ४२ वे पुस्तक आहे.

**अधिक मासानिमित्त सामूहिक दांपत्य भोजन सोहळा :**

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्य ३० + ३ दांपत्यभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात आपण सहभागी व्हावे आणि आपली दांपत्ये सांगून पुरुषोत्तम मासाची पुण्यप्राप्ती करावी, ही विनंती.

**स्थळ : खरे मंगल कार्यालय, सन्मित्र हौसिंग सोसायटी, राजारामपुरी, विद्यापीठ रोड, कोल्हापूर.**

**वेळ : शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी सायं. ५ वा. विष्णूपूजन - आरती - प्रसाद व सायं. ७ वा. सामूहिक दाम्पत्य भोजन**

या कार्यक्रमासाठी यजमानांना येणारा खर्च रु. ३,०००/- + ३००/- असा एकूण ३,३००/- येणार असून त्यामध्ये (३ दाम्पत्य) ६ व्यक्तींच्या भोजनाचा खर्च समाविष्ट केला आहे. आपणामार्फत अधिक व्यक्ती निमंत्रित करण्यात येणार असतील तर ६ व्यक्तींपुढे प्रत्येकी ४००/- प्रमाणे जादा खर्च येईल.

**भोजन, दक्षिणा, सुवासिनींची ओटी आदी सर्व खर्च वरील रक्कमेत समाविष्ट आहे.**

**नोंदणीची अंतिम तारीख : दि. १ ऑगस्ट २०२३**

**संपर्कासाठी दूरध्वनी : ०२३१-२५४६२२५, ७६२०५४६२२५ (कोल्हापूर चित्पावन संघ)**

**७५८८८३९५२७ (श्री. केदार जोशी, कार्यवाह) ८४५९०१९०९१ (श्री. संतोष साने, संचालक)**

Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.